## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**

१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक २५/०७/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५२/२०१२/जा.५०७, दिनांक २५/०७/२०१२, ०७/०८/२०१२, २७/०८/२०१२ व ३१/०८/२०१२.

३) मे. वर्षा वेअरहाऊसिंगचे मालक अतुल ब्रिजलाल शहा यांचे दिनांक ३१/०७/२०१२ रोजीचे निवेदन.

४) पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक ०६/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

५) मे. वर्षा वेअरहाऊसिंगचे मालक अतुल ब्रिजलाल शहा यांचे दिनांक ०८/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

६) जेकेटी एन्टरप्रायझेस प्रा.लि. यांचे दिनांक ०९/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

७) मे. वर्षा वेअरहाऊसिंगचे मालक अतुल ब्रिजलाल शहा यांचे दिनांक १७/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

८) या कार्यालयाची पत्र" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५२/२०१२/जा.५८८, दि. २४/०८/२०१२.

९) मे. वर्षा वेअरहाऊसिंग, मे. कॉमकॉर्प इंटरनॅशनल एलएलपी, मे. ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि., मे. बी.जी.एच. एक्झिम लि., मे. संघार एक्सपोर्टस्, मे. संगम ट्रेडिंग कंपनी, मे. वर्धमान इंडस्ट्रीज, मे. नेहा पल्सेस् व मे. संतोष कुमार ब्रदर्स यांचे दिनांक २८/०८/२०१२ रोजीचे स्वतंत्र निवेदने.

१०) मे. के.एम. गणात्रा ॲन्ड कंपनी व मे. जे.के.टी. इन्टरप्राइझेस प्रा.लि. यांचे दिनांक २९/०८/२०१२ रोजीचे स्वतंत्र निवेदने.

११) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचा दि. २९/०८/२०१२ रोजीचा अहवाल.

१२) पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २९/०८/२०१२ व ३०/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदने.

१३) मे. ग्लॅनकोर ग्रेन इंडिया प्रा. लि. यांचे दिनांक ०४/०९/२०१२ रोजीचे निवेदन.

१४) पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक ०४/०९/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

१५) मे. श्री सिध्दी विनायक ऑईल ॲण्ड फुडस् यांचे दिनांक ०५/०९/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

१६) मे. इंडिसून ॲग्रो फुडस् लि. यांचे दिनांक ०६/०९/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५२/२०१२/जा. ६६६
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : २४/०९/२०१२.

# आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

## प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक २१/०७/२०१२ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी पथक व पंचांसह रात्री ०८.३० वाजता मे. वर्षा वेअरहाऊसिंग, सी ११९, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, एम.आय.डी.सी., पावणे, नवी मुंबई येथे पोहचले. त्या ठिकाणी गेटवरील सुरक्षा चौकीमध्ये उपस्थित वॉचमन श्री. अमरनाथ साह यांचेकडे चौकशी केली असता, त्यांनी सदर वेअरहाऊसींगच्या कार्यालयामध्ये सदर वेअरहाऊसिंगचे मालक बसलेले आहेत. त्यांचेकडे जाण्याकरिता घेऊन गेले.

सदर कार्यालयाच्या उपस्थित असलेल्या इसमाकडे अधिकाऱ्यांनी त्यांची तसेच पंचांची ओळख पटवून दिली व सदर इसमास त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव अतुल ब्रिजलाल शहा असे सांगून तो मे. वर्षा वेअरहाऊसचे मालक असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष सदर वेअरहाऊसिंगमध्ये साठा केलेल्या जिन्नसांची चौकशी केली असता, त्यांनी चौकशीत असे सांगितले की, सदर वेअरहाऊसिंगमध्ये वेगवेगळ्या व्यावसायिकांचे कडधान्यांचे साठे असून तो त्यांच्याकडून वेअरहाऊसिंगचे भाडे घेत असतो. सदर वेअरहाऊसिंगच्या कागदेशिर कागदपत्रांची अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष विचारणा केली असता, सदरचे वेअरहाऊसिंग मे. मॅक्सवेल इंडस्ट्रीज लि. यांचेकडून मासिक भाड्याने घेतले असून त्यांना ते दरमहा रुपये २.५० ते ३ लाख भाडे देत असतो. त्याबाबत अतुल शहा यांनी दिनांक १५/०६/२००९ रोजी झालेल्या भाडेकरारपत्राची मुळ पत्र अधिकाऱ्यांना तपासणीकरिता सादर केली. सदर करारपत्र हे दिनांक १४/०९/२०१० पर्यंत असून ते पुढे दोन वर्षाकरिता विधिग्राह्य राहील असेही त्यात नमूद आहे. त्यानंतर मे. मॅक्सवेल इंडस्ट्रीज लि. यांनी दिनांक १२/०७/२०१२ रोजी गोदामाच्या भाड्याबाबतचे सुधारीत दराबाबत निघालेल्या पत्राची मुळ प्रत अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सादर केली. अधिकाऱ्यांनी अतुल शहा यांचेकडून भाडेकरारांची तसेच दिनांक १२/०७/२०१२ रोजीच्या पत्रांची छायांकित प्रत स्वाक्षरीनिशी ताब्यात घेतली. त्यानंतर अधिकाऱ्यांनी अतुल शहा यांचेकडे वेअरहाऊसिंगच्या लायसन्सबाबत चौकशी केली असता, त्यांनी वेअरहाऊसिंग लायसन्स धारण केलेले नाही. तसेच त्यांचेकडे कडधान्य साठवणूकबाबतचा परवाना घेतलेला नाही. तसेच सदर परवाना मिळणेकरिता संबंधित विभागाकडे अर्जही केलेला नाही. गुमास्ता तसेच अन्न भेसळ परवानाही धारण केलेला नाही, असे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले.

त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष गोदामात असलेलया साठ्याबाबतचे आवक व जावक रजिस्टरबाबत विचारणा केली असता, तसे रजिस्टर नसून पार्टीवाईज म्हणजेच गोदामात साठा ठेवलेल्या व्यवसायीकांच्या ट्रेड

नावाचे रजिस्टर तपासणीसाठी सादर केले. सदर रजिस्टरमध्ये नोंद करणारे श्री. उमाशंकर उपाध्याय यांची ओळख श्री. अतुल शहा यांनी करुन दिली. सदर गोदामात खालील नमूद केलेल्या व्यापाऱ्यांचा माल असून ते सर्व व्यापारी हे आयातदार असल्याचे सांगितले. रजिस्टरमध्ये शिल्लक साठ्याची माहिती दिली, ती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | व्यवसायिकाचे ट्रेड नाव | कडधान्यांचा प्रकार | एकूण बाचकी | एकूण वजन (मे. टन) | दर (मे. टनामध्ये रुपये) | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे. ग्लेनकोर ग्रेन इंडिया | पिवळा वाटाणा | ५८५३७ | २९२६.८५ | २४००० | ७,०२,४४,४००/- |
| २ | कॉम कॉर्पोरेशन इंटरनॅशनल | काळा उडिद | ४८०० | २४०.०० | ३६००० | ८६,४०,०००/- |
| | | तुर | ७२५० | ३६२.५० | ३४००० | १,२३,२५,०००/- |
| ३ | ताज ॲग्रो कमोडीटीज | काळा उडिद | ९१२८ | ४५६.४० | ३६००० | १,६४,३०,४००/- |
| | | तुर | ३४४३ | १७२.१५ | ३४००० | ५८,५३,१००/- |
| ४ | मे. बी.जी.एच. एक्झिम | काळा उडिद | ७२०० | ३६०.०० | ३६००० | १,२९,६०,०००/- |
| | | तुर | ५७६० | २८८.०० | ३४००० | ९७,९२,०००/- |
| ५ | संगहार एक्सपोर्ट | मसुर | २१२० | १०६.०० | ३६००० | ३८,१६,०००/- |
| ६ | मे. संगम ट्रेडर्स | काळा उडिद | २४०० | १२०.०० | ३६००० | ४३,२०,०००/- |
| ७ | मे. वर्धमान इंडस्ट्रीज | मसुर | १००८ | ५०.४० | ३६००० | १८,१४,४००/- |
| ८ | मे. नेहा पलसेस | तुर | १९५७ | ९७.८५ | ३४००० | ३३,२६,९००/- |
| ९ | मे.श्री सिध्दी विनायक फुड्स | तुर | १४८५ | ७४.२५ | ३४००० | २५,२४,५००/- |
| १० | मे. इंडिसन अग्रो फुडस् लि. | पिवळा वाटाणा | ७४० | ३७.०० | २४००० | ८,८८,०००/- |
| ११ | मे. संतोष कुमार ॲंड ब्रदर्स | तुर | १४५६ | ७२.८० | ३४००० | २४,७५,२००/- |
| | | एकूण | १०७२८४ | ५३६४.२० | --- | १५,५४,०९,१००/- |

अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष उपरोक्त अकरा व्यापाऱ्यांची खरेदी बिलेबाबत चौकशी केली असता, सदरचे व्यापारी हे आयातदार असल्याचे अतुल शहा यांनी सांगितले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी बिल ऑफ एन्ट्रीबाबत चौकशी केली असता, सदरच्या बिलाच्या बाबतची कागदपत्रे त्याचेकडे उपलब्ध नाहीत, असे सांगून ते तपासणीच्या वेळेस पुरेसा वेळ देऊनही सादर केलेली नाहीत. त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष अतुल शहा व उमाशंकर उपाध्याय यांचे सोबत सदर वेअरहाऊसिंगमध्ये ठेवलेल्या साठ्याची तपासणी केली. सदरचा साठा हा रजिस्टरमध्ये नमूद केल्याप्रमाणे असल्याचे आढळून आले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी सदर गोदामाच्या बाहेरील बाजूस कडधान्याचा साठा असल्याने संबंधित तुर्भे पोलिस ठाणे यांचे बीट मार्शल क्रमांक १ चे पोलिस हवालदार श्री. फरांदे पी.एन. बक्कल क्रमांक एच.सी. ६३३ तसेच पोलिस नाईक श्री. कवडे ए.एन. बक्कल क्रमांक पीसी १७६२ हे राउंडअपच्यावेळी सदर

वेअरहाऊसिंग सुरक्षा चौकीमध्ये उपस्थित होते व त्यांना सदर घटनेची माहिती देण्यात आली. त्यानंतर पंचांच्या सही शिक्क्यानिशी सदर वेअर हाऊसिंगच्या मेन गेटना जागीच सिलबंद केले व सदर गोदाम पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

अशाप्रकारे मे. वर्षा वेअरहाऊसिंगचे मालक अतुल ब्रिजलाल शहा यांनी सदर वेअर हाऊसिंगमध्ये विनापरवाना अनधिकृत गोदामात तसेच तपासणीच्यावेळी कोणतीही कागदपत्रे न दाखविल्या कारणे सदरचा साठा हा अनधिकृत गोदामात विनापरवाना बाळगल्याकारणे, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० व महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ च्या तरतुदींचा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०७१/२०१२ दिनांक २२/०७/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून जीवनावश्यक वस्तुंमधील डाळी/कडधान्य या अनुसूचीत वस्तूंचा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक केलेला विनापरवाना साठा शासनजमा का करण्यात येवू नये ? याबाबत वाचावे क्र..२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दिनांक ३१/०७/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ३१/०७/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. वर्षा वेअरहाऊसिंगचे मालक अतुल ब्रिजलाल शहा हे उपस्थित राहिले. व त्यांनी वाचावे क्र. ३ अन्वये त्यांचे लेखी निवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी उपस्थित राहिले नाहीत. सदरचे वेअरहाऊस हे एम.आय.डी.सी. च्या कार्यक्षेत्रात असल्याने संबंधित प्राधिकारणाकडून संमतीपत्र व वेअरहाऊस मालकासोबतचे करारपत्र सादर करण्याच्या सुचना अतुल ब्रिजलाल शहा यांना दिल्या असता, सदरचा जप्त साठा हा इतर व्यावसायीकांचा असल्याचे सांगून त्या अनुषंगाने विविध आस्थापनांसोबत साठवणूककरिता कारारनामा नसल्याचे सांगितले. जप्त साठ्याबाबत त्यांना अधिक विचारणा केली असता, ते अनभिज्ञ असल्याचे सांगून साठा मालक याबाबतची माहिती व साठा संबंधीचे पुरावादर्शक कागदपत्रे सादर करु शकतील असे सांगितले. सबब, मे. वर्षा वेअरहाऊसिंगचे मालक यांनी केलेल्या विनंती नुसार नमूद गोदामातील जप्त साठ्याचे मालकांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २८/०८/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

CONTROLLER

मे. वर्षा वेअरहाऊसिंगचे मालक अतुल ब्रिजलाल शहा यांनी वाचावे क्र. ५ अन्वये या कार्यालयास सादर केलेल्या विनंती अर्जानुसार त्यांचे गोदामामध्ये नमुद गुन्हयात न दर्शविलेला व अनुसुचित वस्तु नसलेला मे. जे.के.टी. ईन्टरप्राइझेस प्रा.लि., मे. के. एम. गणात्रा ॲन्ड कं., मे. रिजन्सी स्पाईस एल.एल.पी, मे. सेठ ब्रदर्स, मे. आर.टी.एन्टरप्राईझेस प्रा.लि., मे. भारत ट्रेडिंग कं., मे. हारवेस्ट एन्टरप्राइसेस, मे. सुमती आयुर केम या आस्थापनांचा साठा खराब होवू नये म्हणुन संबंधित साठा मालकांस परत करण्याची विनंती केली. मे. वर्षा वेअरहाऊसिंगचे मालक यांनी सदर पत्रान्वये सादर केलेल्या विविध आस्थापनांच्या यादीमध्ये, मे. जे.के.टी. एन्टरप्राइझेस प्रा.लि. यांचा १२४८.७० क्विंटल खाद्यतेलबियांचा (ब्राऊन व नॅचरल सिसम सिड) साठा, मे. के.एम.गणात्रा ॲन्ड कं. यांचा २१५.० क्विंटल खाद्यतेलबियांचा (एच.एस.सिड) साठा हे अनुसुचित वस्तुंच्या यादीमध्ये समाविष्ट असल्याने व त्यावर साठा निर्बंध लागु असल्याने सदर साठा वगळून नमुद यादीमधील इतर साठा हा अनुसुचित वस्तु नसल्याने तसेच नाशवंत असल्याने तो खराब होऊ नये म्हणून सदर साठा त्यांच्या साठा मालकास तात्काळ परत करण्याचे आदेश देण्याबाबत तसेच पत्रामधील खाद्यतेलबियांचा साठा व या व्यतिरिक्त घटनास्थळी जप्त करण्यात आलेला विविध कडधान्यांचा साठा हा पुढील आदेशापर्यंत जैसे थे स्थितीत जतन करण्याच्या सुचना देण्याबाबत तसेच उर्वरीत साठ्याची धुरीकरण (fumigation) ची गरज असल्यास त्याकरिता परवानगी देऊन सदर साठ्याची धुरीकरण (fumigation) झाल्यानंतर पुन्हा त्याच ठिकाणी जतन करुन ठेवण्याबाबत या कार्यालयाचे वाचावे क्र. ८ अन्वये पत्र निर्गमित करण्यात आले. सबब, मे. वर्षा वेअरहाऊसिंगचे मालक तसेच मे. जे.के.टी. ईन्टरप्राइझेस प्रा.लि. व मे. के. एम. गणात्रा ॲन्ड कं. यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २९/०८/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २८/०८/२०१२ रोजी मे. कॉम कॉर्पोरेशन इंटरनॅशनलचे भागीदार पराग गुप्ता, मे. ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि. चे संचालक हिम्मत जे. चांद्रा, मे. संघार एक्सपोर्टचे भागीदार जीतल रमेश शहा, मे. वर्धमान इंडस्ट्रीजचे भागीदार अजय जैन, मे. नेहा पल्सेसचे मालक तुषार संतोष गोयंका, मे. वर्षा वेअरहाऊसिंगचे मालक अतुल ब्रिजलाल शहा, मे. बी.जी.एच. एक्झीम लि. या कंपनीच्या वतीने प्राधिकारपत्रासह कंपनीचे सहाय्यक व्यवस्थापक गुरुदत्त व्यास, मे. संगम ट्रेडिंग कंपनीचे मालक अश्विन पारसमल शहा, मे. संतोष कुमार ॲंड ब्रदर्सचे मालक संतोष सत्यनारायन अग्रवाल यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ९ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. सदर सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी व इतर साठा मालक उपस्थित राहिले नाहीत अथवा प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहीले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक ०४/०९/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

G & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

दिनांक २९/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. वर्षा वेअरहाऊसिंगचे मालक अतुल ब्रिजलाल शहा यांनी उपस्थित राहून यापूर्वीच दिलेले निवेदन कायम असल्याचे सांगितले. तसेच सदर सुनावणीस मे. के.एम.गणात्रा ॲन्ड कंपनीचे भागीदार ललीत काकुभाई गणात्रा व मे. जे.के.टी. इन्टरप्राइझेस प्रा.लि. चे संचालक कनक किशोर ठक्कर यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. १० अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केले.

दिनांक ०४/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. ग्लॅनकोर ग्रेन इंडिया प्रा. लि. यांच्या वतीने डायरेक्टर श्याम दोशी, सिनियर वाईस प्रेसिडेंट श्रीनिवास बाहेती व ट्रेडर सौरभ भारतीया यांनी उपस्थित राहून कंपनीच्या वतीने वाचावे क्र. १३ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस मे. इंडिसन ॲग्रो फुडस् लि. चे डायरेक्टर महेंद्र जैन व मे. श्री सिध्दी विनायक ऑईल ॲण्ड फुडस्चे भागीदार जिग्नेशकुमार अश्विनलाल यांनी उपस्थित राहून लेखी निवेदन पुढील दोन दिवसात सादर करणार असल्याचे सांगितले. सुनावणीच्या वेळी मे. ग्लॅनकोर ग्रेन इंडिया प्रा. लि. या कंपनीच्या वतीने उपस्थितांनी सदरचा साठा आयात केल्याचे सांगून मुंबई येथील बंदरात वेसलमधून साठा खाली करण्यासाठी सुमारे ३० ते ३५ दिवसांचा कालावधी लागत असल्याचे सांगून सदर यामध्ये तफावत असल्कालावधीमधील या कार्यालयास अवगत करण्यात आलेल्या पत्रान्वये नमूद साठा व प्रत्यक्षात आयात केलेला साठा ाचे निदर्शनास आणून दिले असता उपस्थितांनी समर्पक असे उत्तर दिले नाही व आयात केलेला साठा हा पूर्वी मुंबई येथील विविध गोदामात व तद्नंतर घटनास्थळी वारंवार साठा स्थलातरीत करण्याच्या प्रयोजनाबाबतही त्यांनी समर्पक उत्तर दिले नाही. तसेच घटनास्थळी जप्त असलेला साठा व त्यांनी घटनास्थळी स्थलांतरीत केलेल्या साठयाबाबत या कार्यालयास अवगत केलेल्या पत्रामधील नमुद साठा यामध्येही तफावत असल्याचे आढळून आले आहे. मे श्री सिध्दी विनायक ऑईल ॲन्ड फुडच्या वतीने उपस्थितानी त्यांचा साठा आयात केल्याबाबत तसेच घटनास्थळी साठवणुक केल्याबाबत केंद्रशासनाच्या अधिसुचनांन्वये या कार्यालयास विवरणपत्राद्वारे अवगत न केल्याचे मान्य केले आहे.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद</u> :-

मे. वर्षा वेअरहाऊसिंगचे मालक अतुल ब्रिजलाल शहा यांचे दिनांक ३१/०७/२०१२ रोजीच्या सुनावणीस केलेल्या युक्तीवादामध्ये, दिनांक २१/०७/२०१२ रोजी आपल्या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार फिरते पथक हे पंचांसह गोदामात उपस्थित राहुन वाचमनकडे गोदाम मालकाबाबत विचारणा केली असता त्याने मालक कार्यालयात असल्याचे सांगितले. तथापी, ते सदर गोदामाचे मालक नसल्याचे नमुद केले आहे. कारणे दाखवा नोटीस मधील नमुद मुद्दे हे अंशत: खरे असुन उर्वरीत आरोपामध्ये तत्थ नाही. उपस्थित अधिकाऱ्यांनी काही

कागदपत्रांची मागणी केली असता त्यावेळेस उपलब्ध असलेले कागदपत्रे सादर केली आहेत. त्यांच्याकडे साठवणुकीचा परवाना नसल्याने अधिकाऱ्यांनी त्यांच्याविरुध्द जीवनावश्यक वस्तु कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल केल्याचे नमुद केले आहे. अधिकाऱ्यांनी घटनास्थळी नोंदवहीची मागणी केली असता त्यांच्या कर्मचाऱ्यांनी साठामालकांबाबत माहिती सादर केल्याचे सांगुन खरेदी बिलांबाबत विचारणा केली असता सदरचा साठा हा आयात केला असुन त्यांनी पत्रांन्वये आपल्या कार्यालयास अवगत केल्याचे नमुद करुन बिल ऑफ एन्ट्री त्यांचेकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले. सदरची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर ते स्वत: अधिकाऱ्यांसमवेत तुर्भे पोलिस ठाणे येथे उपस्थित राहीले असता त्यांना तात्काळ अटक करण्यात आली. सदरचा साठा हा अवैधरित्या साठवणुक केलेला नसल्याने त्यांच्याकडून कोणताही गैरप्रकार झालेला नाही. घटनास्थळी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी तपासणीचे वेळेस अधिकाऱ्यांना दिलेली असुन त्यासोबत अद्यावत केलेली नोंदवही व इतर उपलब्ध असलेले कागदपत्रे सादर केली असल्याने त्यांच्या गोदामातील जप्त करण्यात आलेला साठा हा संबंधित साठामालकांस परत करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक ०६/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, सदर गुन्ह्यातील गोदाम हे शिधावाटप अधिकारी यांनी सिल बंद केले असल्याने सदर गुन्ह्यातील मालासंदर्भात १) मालाची पावती, २) गेट पास, ३) डिलीव्हरी चलन, ४) स्टॉक रजिस्टर इत्यादी कागदपत्र अद्याप हस्तगत करण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर गुन्ह्यातील जप्त मालाची मालकी कोणाची आहे, हे स्पष्ट झालेले नाही. तसेच सदर गुन्ह्याचा तपास चालू असून गुन्ह्यातील जप्त मालाची कागदपत्र हस्तगत करुन मालासंदर्भात स्पष्ट अभिप्राय सादर करण्यात येईल, असे नमूद केले आहे.

मे. वर्षा वेअरहाऊसिंगचे मालक अतुल ब्रिजलाल शहा यांचे दिनांक ०८/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, आपण जो आमचा वेअरहाऊसचा माल कब्जात घेतला आहे त्यातील तुमच्या कामाचा माल ठेवून मे. जे.के.टी. इन्टरप्राइझेस प्रा.लिं. यांचा ब्राऊन सिसम सिड, मे. के. एम. गणात्रा ॲन्ड कंपनी यांचा टरमरीक पावडर, एच. एस.. सिड, जिन्जर, रेशिन, चिली, क्रश चिली, ब्रॉनविटा, टी, रेजन्सी स्पाईस एल.एल.पी यांचा रॉ केशु नट्स, सेठ ब्रदर्स यांचा चिली, आर. टी. इन्टरप्राईझेस प्रा.लि. यांचा मुजीठ, मे. भारत ट्रेडिंग कं. यांचा जडी बुटी, मे. हारवेस्ट इंटरप्राइसेस यांचा कॅश्यु केनल, मे. सुमती आयुर केम यांचा अनार छिलका इ. मालांना मी वेळोवेळी दवापाणी न केल्यास ते खराब होतील त्यामुळे ते माल मला परत करण्यात यावे या सोबत आपल्याकडे आमच्या स्टेशनरीचे सुध्दा सामान जप्त आहेत त्याची सुध्दा आम्हाला गरज आहे असे नमुद आहे.

मे. जेकेटी एन्टरप्रायझेस प्रा.लि. यांचे दिनांक ०९/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, ते शासनमान्य निर्यातदार असुन त्यांचा फुडस्टफवर प्रक्रीया करुन निर्यात करण्याचा व्यवसाय आहे. त्यांनी १२२ टन

ब्राऊन सिसम सिड मे. वर्षा वेअरहाऊस येथे निर्यात करण्यासाठी साठवणुक केलेला असुन सदरचा साठा २६ जुन २०१२ च्या सिंगापुर येथील मागणीनुसार ऑगष्ट महिण्याच्या दुसऱ्या आठवडयापासुन शेवटच्या आठवडयापर्यंत पाठवण्याचा असल्याने याबाबतच्या पुरावादर्शक कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर करुन सदरचा गोदामात साठवणुक करण्यात आलेला साठा मुक्त करण्यात यावा अशी विनंती केली.

मे. रिजेन्सी स्पॉयसेस् एलएलपी यांचे दिनांक २३/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, त्यांचे कंपनीचा मे. वर्षा वेअरहाऊसिंग या गोदामात रॉ कॅशु नटस् चा साठा साठवणुक केलेला असुन सदर साठा हा जीवनावश्यक वस्तु कायद्यातील तरतुदीमध्ये येत नसल्याने तसेच सदर रॉ कॅशु नटस्च्या साठयावर निर्बंध नसल्याने सदर साठा मुक्त करण्याची विनंती केली.

मे. वर्षा वेअरहाऊसिंगचे मालक अतुल ब्रिजलाल शहा यांचे दिनांक १७/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, त्यांचा वेअरहाऊसिंगचा व्यवसाय असुन नमुद गोदामात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तु तसेच महत्वाचे कागदपत्रे सिलबंद आहेत. दिनांक ०८/०८/२०१२ रोजी त्यांनी जप्त असलेल्या जीवनावश्यक वस्तुंचा साठा मुक्त करण्याची विनंती केली आहे. दिनांक २१/०७/२०१२ रोजी अधिकाऱ्यांनी जीवनावश्यक वस्तुंची यादी सादर करण्यास सुचित केल्यानुसार त्यांनी यादी सादर केली. परंतु पंचनाम्यामध्ये गोदामात साठवणुक केलेला इतर साठयाचे तपशिल नमुद केलेले नाही. सदरचा इतर साठा विविध व्यापाऱ्यांचा असुन तो निर्यात करावयाचा असल्याने सद्यस्थितीत वेअरहाऊस सिलबंद असल्याने त्यांना परत न केल्यास त्यांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदरचा साठा बाहेर काढण्याची परवानगी न दिल्यास व व्यवस्थित जतन न केल्याने साठा खराब झाल्यास ग्राहकांना आर्थिक नुकसान होईल. गोदामात आवश्यक कागदपत्रे सिलबंद असल्याने त्यांना आयकर विभागाचे विवरणपत्र सादर करणे शक्य झाले नसल्याचे नमुद करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २८/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. वर्षा वेअरहाऊसिंगचे मालक अतुल ब्रिजलाल शहा यांनी युक्तीवाद केला की, त्यांच्या वेअरहाउसमध्ये १) मे. ग्लॅनकोर ग्रेन इंडियाचे मालक, २) कॉम कॉर्पोरेशन इंटरनॅशनलचे मालक, ३) ताज अग्रो कमोडिटीजचे मालक, ४) मे. बी.जी.एच. एक्झिमचे मालक, ५) संगहार एक्सपोर्टचे मालक, ६) मे. संगम ट्रेडर्सचे मालक, ७) मे. वर्धमान इंडस्ट्रीजचे मालक, ८) मे. नहा पलसेसचे मालक, ९) मे. श्री सिध्दीविनायक फुडस्चे मालक, १०) मे. इंडियन ॲग्रोचे मालक, ११) मे. संतोष कुमार ॲन्ड ब्रदर्सचे मालक या आयातदाराचा साठा ठेवलेला आहे. सदर नमूद आयातदारांच्या व्यतिरिक्त कोणत्याही व्यापारी यांचा घाऊक/कमिशन एजंट/ किरकोळ या व्यापाऱ्यांचा माल त्यांच्या गोदामामध्ये नाही. सदर नमूद आयातदारांना रेशनिंगचा परवाना लागतो किंवा नाही, याची त्याला माहिती नाही. तथापी, दिनांक २१/०७/२०१२ रोजी आपल्या पथकाने तपासणी केली. त्यावेळी सदर नमूद ११ आयातदारांचे बिल ऑफ एन्ट्री/बिल ऑफ लॅडिंग इत्यादी

कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती, ही बाब सत्य आहे. त्यानंतर त्याने सदर नमूद ११ व्यापाऱ्यांची कागदपत्रे आपल्या कार्यालयात सादर केलेली आहेत. या सर्व बाबींचा सहानभुतीपूर्वक विचार करुन त्याला योग्य तो न्याय द्यावा, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २८/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. कॉम कॉर्पोरेशन इंटरनॅशनलचे भागीदार पराग गुप्ता यांनी युक्तीवाद केला की, त्यांनी त्यांचा व्यवसाय एप्रिल २०१२ पासुन सुरु केलेला असुन ते मुंबई पोर्ट व न्हाव्हाशेवा पोर्टमध्ये कडधान्य आयात करीत असुन याबाबत आयात होणाऱ्या कडधान्याची पूर्वीच माहिती या कार्यालयास देत असुन कडधान्याची आयात झाल्यानंतर त्याबाबतचे मासिक विवरणपत्र वेळोवेळी सादर करीत असल्याचे नमुद केले आहे. त्यांचा मे. वर्षा वेअरहाऊस येथे बिल ऑफ एन्ट्री क्रमांक ७२०८८१८ दिनांक २५/०६/२०१२, ७१९०६८१ दिनांक २२/०६/२०१२ व ७१२९६४७ दिनांक १६/०६/२०१२ अन्वये ७२५० बाचक्यांमधील ३६१.२८९ मे.टन लेमन तुर व बिल ऑफ एन्ट्री क्रमांक ७१६२०१२ दिनांक २०/०६/२०१२ व ७१९०६८२ दिनांक २२/०६/२०१२ अन्वये ४८०० बाचक्यांमधील २३९.५६३ मे. टन काळे उडीद या कडधान्यांचा आयात केलेला साठा साठवणुक केलेला असुन सदर साठा आयात केल्याबाबतचे बिल ऑफ एन्ट्री, या कार्यालयास सादर केलेले सुचनापत्रांच्या छायांकित प्रती सादर करुन त्यांचा साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २८/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि. चे संचालक हिम्मत जे चंद्रा यांनी युक्तीवाद केला की, ते कडधान्याच्या साठयाचे आयातदार असुन त्यांचा मे. वर्षा वेअरहाऊस येथे आयात केलेला काळे उडीदचा ९१२९ बाचक्यांमधील ४५४.९२१ मे. टन व मसुरचा ३४३७ बाचक्यांमधील १८०.९२० मे. टन साठा हा मे. वर्षा वेअरहाऊस येथे साठवणुक केलेला साठा जप्त असुन त्यांनी याबाबत चर्चगेट येथील कार्यालयात अवगत केले असल्याने त्यांचा जप्त असलेला साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २८/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. बी.जी.एच. एक्झिम लि. या कंपनीच्या वतीने प्राधिकारपत्रासह कंपनीचे सहाय्यक व्यवस्थापक गुरुदत्त व्यास यांनी कंपनीच्या वतीने सादर केलेल्या निवेदनात, ते कडधान्याच्या साठयाचे आयातदार असुन त्यांचा मे. वर्षा वेअरहाऊस येथे आयात केलेला काळे उडीदचा अंदाजे ३६०.९७४ मे. टन व लेमन तुर अंदाजे २८९.४० मे. टन साठा जप्त असुन दिनांक २०/०५/२०१२ चे शासन परिपत्रकानुसार आयात केलेला कडधान्यांचा साठा निर्बंधमुक्त आहे. साठयाच्या पुराव्यादाखल बिल ऑफ लेडींग, सुचनापत्र व मासिक साठा विवरणपत्राच्या छायांकित प्रती सादर केले असल्याने त्यांचा जप्त असलेला साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... ICE

0010 दिनांक २८/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. संघार एक्सपोर्टस्‌चे भागीदार जीतल रमेश शहा यांनी युक्तीवाद केला की, ते कडधान्याच्या साठयाचे आयातदार असुन त्यांचा मे. वर्षा वेअरहाऊस येथे आयात केलेला मसुरचा ११६.० मे. टन साठा जप्त असुन सदरचा साठा बिल ऑफ एन्ट्री क्रमांक ७३२९४०९ अन्वये दिनांक ०९/०७/२०१२ रोजी कॅनडा येथुन आयात करुन दिनांक १७/७/२०१२ रोजी सदर वेअरहाऊस येथे साठवणुक केलेला आहे. याबाबत त्यांनी या कार्यालयास दिनांक २३/०७/२०१२ रोजी सुचनापत्र दिलेले आहे. तद्‌नंतर दिनांक १८/०७/२०१२ रोजी २५०५ बाचक्यांमधील १३७.३७ मे. टन साठा हा पुर्विच्या साठया व्यतिरीक्त नमुद गोदामात साठवणुक करुन त्यापैकी दिनांक २०/०७/२०१२ रोजी ३८५ बाचक्यांमधील २०.५१ मे.टन साठा हा खरेदीदारास वितरीत केला असुन उर्वरीत साठा ट्रकची व्यवस्था न झाल्याने त्यांना उचल करणे शक्य झाला नाही. साठयाच्या पुराव्यादाखल बिल ऑफ एन्ट्री व सुचनापत्राच्या छायांकित प्रत सादर करुन जप्त असलेला साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २८/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. संगम ट्रेडिंग कंपनीचे मालक अश्विन पारसमल शहा यांनी युक्तीवाद केला की, त्यांच्याद्वारे आयात करण्यात आलेला मुद्देमाल जो वर्षा वेअरहाऊसमध्ये ठेवण्यात आला होता. तो मुद्देमाल त्यांनी सिंगापुर येथून त्यांच्या संगम ट्रेडिंग कंपनीच्या नावे खरेदी केला होता. त्यासंबंधीचे इन्वाईस, बिल ऑफ लेडिंग, बिल ऑफ एन्ट्री आपणांस सुचित करण्यात आले होते. पत्र आणि त्यासंबंधीचे महत्त्वाचे कागदपत्रे निवेदनासोबत जोडली आहेत. त्यांचा मुद्देमाल दिनांक १७/०७/२०१२ रोजी ठेवण्यात आला होता. कारण त्यांच्याकडे ट्रान्सपोर्टची व्यवस्था नसल्याकारणाने गोडाऊनमध्ये ठेवण्यात आला होता आणि ३ दिवसानंतर त्यांना समजले की, त्यांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तरी सदर मुद्देमाल हा त्यांच्या मालकीचा असल्याने त्यांना परत करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २८/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. वर्धमान इंडस्ट्रीजचे भागीदार अजय जैन यांनी युक्तीवाद केला की, त्यांचा मे. वर्षा वेअरहाऊस येथे १००८ बाचक्यांमधील मसुरचा ६५.०५ मे. टन साठा जप्त असुन साठयाच्या पुराव्यादाखल बिल ऑफ एन्ट्री व खरेदी बिलांच्या छायांकित प्रती सादर करुन जप्त असलेला साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २८/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. नेहा पल्सेसचे मालक तुषार संतोष गोयंका यांनी युक्तीवाद केला की, त्यांच्याद्वारे आयात करण्यात आलेला मुद्देमाल जो वर्षा वेअरहाऊसमध्ये ठेवण्यात आला होता. तो मुद्देमाल त्यांनी सिंगापुर येथून त्यांच्या नेहा पल्सेस या नावे खरेदी केला होता. त्यासंबंधीचे बिल ऑफ लॅडिंग, इन्वाईस, पॅकिंग लिस्ट, बिल ऑफ एन्ट्री निवेदनासोबत जोडण्यात आली आहे. सदर मुद्देमाल न्हावाशेवा पोर्ट, मुंबई येथे आल्यानंतर त्यांच्या क्लिअरिंग एजन्टने प्राप्त केला होता. त्यावेळी त्यास समजले की, कंटेनर खराब

झाल्यामुळे मुद्देमालाचे नुकसान झाले आहे. त्यासाठी त्यांनी इन्शुरन्स क्लेमकरिता इन्शुरन्स कंपनीला माहिती दिली त्याची प्रत निवेदनासोबत जोडली आहे. सदर माल त्यांनी त्याच्या स्वतःच्या उपयोगाकरिता आयात केला होता. इन्शुरन्स क्लेमकरिता सदर मुद्देमाल गोदामात ठेवला होता. सदर मुद्देमाल त्यांनी बँकेमधून लोन घेऊन घेतला असून त्यांना बँकेचे पैसे भरावयाचे आहेत. तरी सदर मुद्देमाल हा त्यांना परत करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २८/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. संतोष कुमार अँड ब्रदर्सचे मालक संतोष सत्यनारायन अग्रवाल यांनी युक्तीवाद केला की, त्यांचा मे. वर्षा वेअरहाऊस येथे १४५७ बाचक्यांमधील तुरचा साठा जप्त असुन साठयांच्या पुराव्यादाखल बिल ऑफ एन्ट्री व खरेदी बिलांच्या छायांकित प्रती सादर करुन जप्त असलेला साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २९/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. के.एम. गणात्रा ॲन्ड कंपनीचे भागीदार ललीत काकुभाई गणात्रा यांनी युक्तीवाद केला की, त्यांचा मिर्ची, खाद्यबिया आणि नटस्, कडधान्य, सिरल्स व पक्षीखाद्याचा निर्यातीचा व्यवसाय असुन फक्त निर्यातीसाठीच विक्री करतात. ते विविध वितरक, व्यापारी आणि उत्पादक यांचेकडून खरेदी केलेला साठा निर्यात करण्यासाठी नवी मुंबई येथील गोदामात साठवणूक करुन तो साठा जेएनपीटी येथील बंदरात पाठविण्यात येत असल्याचे नमूद केले आहे. मे. वर्षा कोल्ड स्टोअरेज ॲन्ड वेअरहाऊस येथे साठवणुक केलेला सदरचा साठा एक्साईज अधिकाऱ्यांसमक्ष कन्टेनरमध्ये सर्व परवानग्या प्राप्त करुन भरण्यात येतो. त्यांनी जीवनावश्यक वस्तू असलेला २१.५ मे. टन सिसम सिडचा साठा उक्त गोदामामध्ये साठवणुक करुन त्यापैकी १९ मे.टन साठा ऑर्डर क्र. ८८७ अन्वये सिरीया या देशात निर्यात करावयाचा असून उर्वरीत २.५ मे.टन साठ्याचे खरेदी बिल व निर्यात बिल सादर केले आहे. ते स्पाईस बोर्ड, एपीईडीए, आयओपीईपीसी, टी बोर्ड, ऑल इंडीया स्पाईसेस एक्स्पोर्टर्स् फोरम, इंडियन स्पाईसेस ॲन्ड फुडस्टफ एक्स्पोर्टर असोसिएशन, एपीएमसी व इंडो जर्मन चेंबर ऑफ कॉमर्सचे सदस्य आहेत. त्यांनी सदरचा साठा कोणत्याही नफा कमावण्याच्या उद्देशाने अथवा साठेबाजीच्या उद्देशाने ठेवलेला नसुन फक्त निर्यात करण्यासाठीच साठवणुक केलेला असल्याचे नमुद करुन याबाबतचे पुरावादर्शक कागदपत्रे सादर करुन जप्त असलेला साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २९/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. जे.के.टी. इन्टरप्राइझेस प्रा.लि. चे संचालक कनक किशोर ठक्कर यांनी युक्तीवाद केला की, ते शासनमान्य निर्यातदार असुन जप्त केलेला साठा स्थानिक बाजारपेठेत विक्री करण्यासाठी नसुन सदर साठा हा निर्यात करावयाचा होता. त्यांचा साठा निर्यातीच्या मागणीनुसार खरेदी केलेला असुन त्याबाबतचे साठा मालकीबाबतचे पुरावे म्हणुन आवश्यक कागदपत्रे त्यांच्या यापूर्वीच्या दिनांक

०९/०८/२०१२ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेली आहेत. त्यांनी खरेदी केलेला त्यांचा साठा गोदामामध्ये साठेबाजीच्या उद्देशाने साठवणुक केलेला नसुन निर्यातीसाठी केलेला आहे. त्यांनी सन २०१० मध्ये परवान्यासाठी अर्ज केलेला होता परंतु त्यांना परवाना मिळाला नसल्याचे सांगुन साठवणुक केलेला साठा नाशवंत असल्याने त्यांचे निवेदन स्विकारुन त्यांचा सदरच्या गोदामात साठवणुक करण्यात आलेला साठा मुक्त करण्यात यावा अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २९/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, सदर गुन्ह्यातील गोदामातील जप्त करण्यात आलेल्या मालापैकी, १) कॉमक्रॉप इंटरनॅशनल, २) इंडीसन अग्रो फुडस् लिमीटेड, ३) ताज ॲग्रो कमोडिटी प्रा.लि., ४) वर्धमान इंडस्ट्रीज, ५) संगहार एक्सपोर्ट, ६) संगम ट्रेडिंग, ७) गॅलकोर ग्रेन इंडीया प्रा.लि. व ८) नेहा पलसेस यांच्या कंपनीच्या वतीने जबाब देण्यासाठी समक्ष पोलिस ठाण्यात हजर झाल्याने त्यांचे सविस्तर जबाब नोंद करण्यात आलेले आहेत. सदरपैकी १) ताज ॲग्रो कमोडिटी प्रा.लि., २) संगहार एक्सपोर्ट व ३) संगम ट्रेडिंग या कंपनीचे मुळ मालक समक्ष हजर राहिलेले असून इतर कंपनीचे मुळ मालक समक्ष हजर राहिलेले नाहीत. तसेच १) मे. बी.जी.एच. एक्झीन, २) मे. सतोष कुमार ॲन्ड ब्रदर्स व ३) मे. सिध्दी विनायक फुडस या कंपनीचे वतीने कोणीही जबाब देण्यासाठी समक्ष हजर राहिलेले नाहीत. तरी सदर गुन्ह्यातील जप्त साठ्याबाबतचे योग्य पुरावादर्शक कागदपत्रांची पडताळणी करुन सदर मालाबाबत योग्य त्या अटी व शर्तीनुसार आपले आदेश होण्यात विनंती आहे, असे नमूद केले आहे. तसेच दिनांक ३०/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, आपले क्र निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५२/२०१२ जा. ५८८ दिनांक २४/०८/२०१२ अन्वये दिलेल्या आदेशाप्रमाणे मे. सेठ ब्रदर्स, मे. के.एम. गणात्रा, मे. आर.टी. एन्टरप्रायझेस प्रा.लि., मे. रेजन्सी स्पाईस एल.एल. पी. या आस्थापनांचा अनुसुचित वस्तू नसलेला साठा संबंधित साठा मालकांस परत करण्यात आलेला आहे. सदर बाबत रेशनिंग अधिकारी यांनी सविस्तर पंचनामा केलेला आहे. तसेच सदर वेळी मे. जे.के.टी. इन्टरप्राइझेस प्रा.लि., मे. भारत ट्रेडिंग कं., मे. हारवेस्ट इंटरप्राइसेस, मे. सुमती आयुर केम या आस्थापनेकडील संबंधित साठा मालक हे हजर न झाल्याने त्यांना सदरचा माल देता आलेला नाही, असे नमूद केले आहे.

उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी सादर केलेल्या अहवालात, जप्त साठ्याचे साठामालकांकडे महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडीटीज होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर, १९९८ अन्वये अन्नधान्य/कडधान्याच्या घाऊक व्यापाराकरिता आवश्यक असलेल्या परवाना साठा मालकांनी धारण केला आहे किंवा कसे ? असल्यास त्याचे तपशिल, परवानाधारकाचा पत्ता, परवानावरील वेगळे गोदाम नमूद आहे किंवा कसे ? असल्यास त्याचा तपशिल व नसल्यास जप्त करण्यात आलेल्या गोदामात साठा मालकांनी साठवणूक केल्याबाबतचे

सुचनापत्र दिले आहे किंवा कसे ? तसेच परवाना असल्यास त्याची वैधता याबाबतचा साठामालक निहाय परिपूर्ण अहवाल सादर केला आहे.

दिनांक ०४/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. ग्लॅनकोर ग्रेन इंडिया प्रा. लि. यांच्या वतीने उपस्थित डायरेक्टर श्याम दोषी, सिनियर वाईस प्रेसिडेंट श्रीनिवास बाहेती व ट्रेडर सौरभ भारतीया यांनी कंपनीच्या वतीने दिलेल्या निवेदनात, ते कडधान्यासहित इतर शेती मालांचे आयातदार असून दिनांक १७/०९/२०११ रोजी त्यांनी १२२००.०१४ मे. टन पिवळे वटाणाचा साठा आयात केल्याचे सांगून त्या अनुषंगाने त्यांनी उपनियंत्रक शिधावाटप यांना दिनांक १२/०९/२०११ रोजी अवगत केले आहे. दिनांक २८/०९/२०११ रोजी त्यांनी आयात प्रक्रिया पूर्ण करुन कार्गोमधील साठ्याची आवक घेण्यास सुरुवात केली व त्यानुसार उपनियंत्रक शिधावाटप यांना कळविण्यात आले आहे. सदर कन्साईमेंटमधील आवक झालेला साठा हा विविध गोदामात साठवणूक करुन त्यापैकी विक्री करुन उर्वरीत साठा हा नवी मुंबई, ठाणे व रायगड येथील विविध गोदामात उपलब्ध असलेल्या जागेनुसार साठवणूक केल्याचे नमूद केले आहे. दिनांक २८/०३/२०१२ व ०३/०७/२०१२ रोजीच्या पत्रान्वये उपनियंत्रक शिधावाटप यांना वर्षा वेअरहाऊस येथील साठवणूक केलेल्या साठ्याचे दिनांक ०१/०६/२०१२ ते ३०/०६/२०१२ या कालावधीचे विवरणपत्र सादर केले आहे. दिनांक २१/०७/२०१२ रोजी घटनास्थळी नमूद गोदामाच्या प्रतिनिधींनी त्यांच्या साठ्यासंबंधीचे कागदपत्रे सादर केले. तथापी, अधिकाऱ्यांनी गोदाम मालकाकडे आवश्यक साठवणूकीचा परवाना नसल्याने त्यांचा साठा जप्त केला आहे. महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटीज होलसेल डिलर्स लायसन्सिग ऑर्डर, १९९८ तसेच केंद्र शासनाच्या अधिसुचनेनुसार त्यांना साठा निर्बंध लागू नसल्याचे नमूद केले आहे. जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत प्राप्त असलेल्या अधिकारान्वये वर्षा वेअरहाऊसिंग येथील ५८५३७ बाचक्यांमधील कडधान्यांचा आयात केलेला साठा हा जप्त असल्याने जीवनावश्यक वस्तू कायद्यामधील तरतुदी त्यांना लागू होत नसल्याने त्यांचा जप्त करण्यात आलेला साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

मे. श्री सिध्दी विनायक ऑईल ॲण्ड फुडस् यांचे दिनांक ०५/०९/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, ते गुजरात येथे स्थायीक असल्याने त्यांनी कडधान्याच्या आयात व साठवणूक संबंधी अवगत केले नसून ही बाब त्यांच्याकडून नजर चुकीने व कायदे विषयक तरतुदींपासून ते अनभिज्ञ असल्याने राहून गेल्याचे नमूद केले. सदर कृत्याबाबत त्यांनी दिलगिरी व्यक्त केली असून याबाबत त्यांना क्षमापीत करण्यात यावे असे नमूद करुन यापुढे सर्व बाबींची पूर्तता तसेच विवरणपत्र नियमितपणे सादर करण्यात येईल असे नमूद करुन साठा संबंधीचे इम्पोर्ट इन्व्हाईस, बिल ऑफ लेडिंग, बिल ऑफ एन्ट्री इत्यादी कागदपत्रे सादर केली असल्याचे नमूद केले आहे.

मे. इंडिसन ॲग्रो फुडस् लि. यांचे दिनांक ०६/०९/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, सुनावणीमध्ये केलेल्या युक्तीवादाच्या अनुषंगाने ते निवेदन सादर करीत असल्याचे नमूद करुन त्यांचा डॉकमधील

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE BAI

0014

साठ्यांचा निपटारा होण्यास उशिर झाल्याने त्यांचा साठा नमूद वेअरहाऊसमध्ये साठवणूक करण्यास उशिर झाल्याचे नमूद करुन निवेदनासोबत शिपिंग कंपनीकडील पत्रामध्ये डॉकमधील साठा उचलण्याबाबतचे तपशिल नमूद आहे. साठ्यासंबंधीचे बिल ऑफ एन्ट्री, मासिक विवरण पत्र, अवगत केल्याचे पत्र इत्यादी पुरावादर्शक कागदपत्रे सादर करण्यात येत असून त्यांचा जप्त साठा मुक्त करुन त्यांना नमूद वेअरहाऊसमधून उचल करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, पोलिसांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक २१/०७/२०१२ रोजी या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी पंचांसह मे. वर्षा वेअरहाऊसिंग, सी ११९, टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, एम.आय.डी.सी., पावने, नवी मुंबई या ठिकाणी टाकण्यात आलेल्या धाडीत विविध कडधान्यांचा साठा हा साठवणूकीच्या आवश्यक कागदपत्र व परवान्याशिवाय आढळून आल्याने अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष जप्त करुन संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० व महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ च्या तरतुदींचा भंग केल्यावरुन तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०७१/२०१२ दिनांक २२/०७/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२२२७ (अ), दिनांक २७ सप्टेंबर, २०११ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१२ पर्यंत निर्बंध आहेत. तसेच केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२७१६ (अ), दिनांक २९ नोव्हेंबर, २०११ अन्वये तांदुळ या अनुसुचित वस्तूवर दिनांक ३०/११/२०१२ पर्यंत निर्बंध आहेत.

शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक ९ मे, २००८ अन्वये शासनाने लागु केलेल्या साठामर्यादेच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही संदर्भातील मार्गदर्शक सुचनांमध्ये केंद्रशासनाने डाळी, तांदुळ, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठयावर निर्बंध आणलेले आहेत त्यामुळे या वस्तुंचा व्यापार करण्यासाठी घाऊक अथवा किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे. डाळी, तांदुळ, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठामर्यादेबाबत लागु केलेले निर्बंध हे हया वस्तु आयात केल्यास त्यावर लागु राहणार नाहीत. तसेच आयात वस्तुंचा व्यापार करण्यासही प्रतीबंध राहणार नाही. मात्र त्या व्यापाऱ्यांना मासीक विवरणपत्र भरण्यास सांगण्यात यावे असे नमुद आहे. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१०१०/४९५/प्र.क्र.९४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २०१० अन्वये केंद्र

शासनाने तांदुळ, धान, डाळी, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठामर्यादेवर निर्बंध लागु केले आहेत. सबब, या वस्तुंचा व्यापार व साठवणुक करण्याकरीता संबंधित अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडून परवाना घेणे आवश्यक आहे. या वस्तुंच्या आयातदारांना साठामर्यादेतुन सुट देण्यात आलेली आहे. परंतु खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या निर्यातदारांना परवाना घेणे आवश्यक आहे. म्हणजेच डाळी/कडधान्य तसेच अन्नधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तुंचा व्यापार करणारे घाऊक व्यापारी व निर्यातदार यांना सदर अनुसुचित वस्तुंच्या खरेदी, साठवणूक व विक्रीच्या व्यवसायाकरीता महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ अन्वये घाऊक परवाना घेण्याची आवश्यकता आहे.

महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ अन्वये देण्यात येणाऱ्या घाऊक परवानामधील "अट क्रमांक २(अ) नुसार अनुज्ञप्तधारक उपरोक्त व्यवसाय परवानामधील नमुद जागेत व्यवसाय करण्याबाबत" सुचित केले असुन, अट क्रमांक २(ब) नुसार "अनुज्ञाप्तीधारक ज्याला उपरोक्त धंदा चालवावयाचा आहे. अनुसुचित वस्तुचा परवानामध्ये उल्लेखिलेल्या गोदामांव्यतिरीक्त इतर कोणत्याही ठिकाणी साठवणुक न करण्याबाबत" नमुद आहे. तसेच "अनुज्ञाप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविले पाहीजे व अनुज्ञाप्ती, बदल करण्यासाठी, अनुज्ञाप्ती प्राधिकरणाला सादर केली पाहिजे." असे स्पष्ट नमुद केले आहे.

पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे अभिवेदनात, सदर गुन्ह्यातील गोदाम हे शिधावाटप अधिकारी यांनी सिल बंद केले असल्याने सदर गुन्ह्यातील मालासंदर्भात १) मालाची पावती, २) गेट पास, ३) डिलीव्हरी चलन, ४) स्टॉक रजिस्टर इत्यादी कागदपत्र अद्याप हस्तगत करण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर गुन्ह्यातील जप्त मालाची मालकी कोणाची आहे, हे स्पष्ट झालेले नाही. सदर गुन्ह्याचा तपास चालू असून गुन्ह्यातील जप्त मालाची कागदपत्र हस्तगत करुन मालासंदर्भात स्पष्ट अभिप्राय सादर करण्यात येईल, असे नमूद केले आहे. तसेच तद्नंतरच्या अभिवेदनात, सदर गुन्ह्यातील गोदामातील जप्त करण्यात आलेल्या मालापैकी, १) ताज ॲग्रो कमोडिटी प्रा.लि., २) संगहार एक्सपोर्ट व ३) संगम ट्रेडिंग या कंपनीचे मुळ मालक जबाब देण्यासाठी समक्ष पोलिस ठाण्यात हजर झाल्याने त्यांचे सविस्तर जबाब नोंद करण्यात आलेले असून इतर कंपनीचे मुळ मालक समक्ष हजर राहिलेले नाहीत. तसेच १) मे. बी.जी.एच. एक्झीन, २) मे. सतोष कुमार ॲन्ड ब्रदर्स व ३) मे. सिध्दी विनायक फुडस या कंपनीचे वतीने कोणीही जबाब देण्यासाठी समक्ष हजर राहिलेले नाहीत. तरी सदर गुन्ह्यातील जप्त साठ्याबाबतचे योग्य पुरावादर्शक कागदपत्रांची पडताळणी करुन सदर मालाबाबत योग्य त्या अटी व शर्तीनुसार आपले आदेश होण्यात विनंती आहे, असे नमूद केले आहे.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE ...BAI

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२२२७ (अ), दिनांक २७ सप्टेंबर, २०११ अन्वये डाळी/कडधान्य व खाद्यतेल या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१२ पर्यंत निर्बंध आहेत. तथापी, "Central Government or State Government may direct the Importers to declare the receipts of stocks of these commodities and stocks retained by them" असे निर्देश दिलेले आहेत. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २००८ अन्वये डाळीसाठी साठा मर्यादा व परवाना घेण्याची आवश्यकता याबाबत लागू केलेले निर्बंध हे आयात केलेल्या डाळींसाठी लागू राहणार नाहीत. त्यामुळे आयात केलेल्या डाळींच्या साठवणूक व प्रक्रियेसाठी व्यापाऱ्यांना परवाना घेण्याची आवश्यकता नाही. तथापी, त्यांनी आयात केलेल्या डाळीची खरेदी विक्री केल्यास यापुढे पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी/उपनियंत्रक शिधावाटप यांचेकडे रिटर्न्स भरावेत. रिटर्न्स भरतांना त्यामध्ये कंपनीच्या मालकाचे नांव, नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता, गोदामाचा पत्ता, सुरुवातीची शिल्लक, आयात केलेल्या डाळीचा तपशिल, विक्री केलेल्या डाळीचा तपशिल, शिल्लक साठा इत्यादींचा स्पष्ट उल्लेख असावा असे नमूद आहे. तसेच आयात डाळीची विक्री करताना पावतीवर " Imported pulses " असा स्पष्ट उल्लेख करावा व आयात केलेल्या डाळीवरील क्रमांक व दिनांक पावतीवर स्पष्टपणे नमूद करुन बिल ऑफ एन्ट्रीची एक सत्य प्रत संबंधितांना द्यावी, असे नमूद आहे.

मे. कॉम कॉर्पोरेशन इंटरनॅशनलचे भागीदार पराग गुप्ता यांनी केलेल्या खुलाशात, त्यांनी त्यांचा व्यवसाय एप्रिल २०१२ पासुन सुरु केलेला असुन ते मुंबई पोर्ट व न्हाव्हाशेवा पोर्टमध्ये कडधान्य आयात करीत असुन याबाबत आयात होणाऱ्या कडधान्याची पूर्वीच माहिती या कार्यालयास देत असुन कडधान्याची आयात झाल्यानंतर त्याबाबतचे मासिक विवरणपत्र वेळोवेळी सादर करीत असल्याचे नमुद केले आहे. त्यांचा मे. वर्षा वेअरहाऊस येथे तुरचा ३६१.२८९ मे. टन व ४८०० बाचक्यांमधील २३९.५६३ मे. टन काळे उडीद या कडधान्यांचा आयात केलेला साठा साठवणुक केलेला असुन सदर साठा आयात केल्याबाबतचे बिल ऑफ एन्ट्री, या कार्यालयास सादर केलेले सुचनापत्रांच्या छायांकित प्रती सादर करुन त्यांचा साठा मुक्त करण्याची विनंती केली. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने मे. कॉम कॉर्पोरेशन इंटरनॅशनल यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला तुर व काळे उडीद या कडधान्यांचा साठा आयात केल्याबाबत या कार्यालयास मासिक विवरणपत्र सादर केल्याचे आढळून आले आहे. मे. कॉम कॉर्पोरेशन इंटरनॅशनल यांनी आयात संबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, तुर या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ७२०८८१८ दिनांक २५/०६/२०१२ रोजी २४५० बाचक्यांमधील १२२२.८४ क्विंटल, बिल ऑफ एन्ट्री क्र. ७१९०६८१ दिनांक २२/०६/२०१२ रोजी २४०० बाचक्यांमधील ११९८.३९



CONTROLLER OF RATION

क्विंटल साठा व बिल ऑफ एन्ट्री क्र. ७१२९६४७ दिनांक १६/०६/२०१२ रोजी २४०० बाचक्यांमधील १२००.३८ क्विंटल साठा असा एकूण ७२५० बाचक्यांमधील ३६२१.६१ क्विंटल साठा आयात केला असुन काळे उडीद या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ७१६२०१२ दिनांक २०/०६/२०१२ रोजी २४०० बाचक्यांमधील १२०१.९० क्विंटल, बिल ऑफ एन्ट्री क्र. ७१९०६८२ दिनांक २२/०६/२०१२ रोजी २४०० बाचक्यांमधील १२०१.४१ क्विंटल साठा असा एकूण ४८०० बाचक्यांमधील २४०३.३१ क्विंटल साठा आयात केला असल्याचे तसेच त्यापैकी सदरचा तुर व काळे उडीदचा साठा त्यांनी मे. वर्षा वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याचे दिसून येत आहे. सदरचा दोन्ही कडधान्यांचा आयात केलेला साठा हा त्याच परिमाणात नमुद गोदामावर साठवणुक केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. मे. कॉम कॉर्पोरेशन इंटरनॅशनल यांनी सुनावणीमध्ये आयात केलेला साठा सद्य:स्थितीत नमूद गोदामावर शिल्लक असल्याचे सांगुन उपरोक्त आयात साठ्याबाबतचे आय.ई.सी. प्रमाणप्रत्र, बिल ऑफ लेडिंग व बिल ऑफ एन्ट्री ही सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केले आहे. सबब, मे. कॉम कॉर्पोरेशन इंटरनॅशनल यांचा आयात केलेला तुर व काळे उडीदचा साठा वैध असल्याचे दिसुन येते.

मे. ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि. चे संचालक हिम्मत जे चंद्रा यांनी केलेल्या खुलाशात ते कडधान्याच्या साठयाचे आयातदार असुन त्यांचा मे. वर्षा वेअरहाऊस येथे आयात केलेला काळे उडीदचा ९१२९ बाचक्यांमधील ४५४.९२१ मे. टन व मसुरचा ३४३७ बाचक्यांमधील १८०.९२० मे. टन साठा हा मे. वर्षा वेअरहाऊस येथे साठवणुक केलेला साठा जप्त असुन त्यांनी याबाबत चर्चगेट येथील कार्यालयात अवगत केले असल्याने त्यांचा जप्त असलेला साठा मुक्त करण्याची विनंती केली. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने मे. ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि. यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला तुर व काळे उडीद या कडधान्यांचा साठा आयात केल्याबाबत या कार्यालयास मासिक विवरणपत्र सादर केल्याचे आढळून आले आहे. मे. ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि. यांनी आयात संबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, काळे उडीद या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ६६२१२६० दिनांक ०३/०५/२०१२ रोजी २४०० बाचक्यांमधील ११९४.६५ क्विंटल, बिल ऑफ एन्ट्री क्र. ६६७५२३२ दिनांक ०७/०५/२०१२ रोजी २४०० बाचक्यांमधील १२०१.२० क्विंटल साठा, बिल ऑफ एन्ट्री क्र. ४८६४०३४ दिनांक १८/०५/२०१२ रोजी २४०० बाचक्यांमधील १२००.३४ क्विंटल साठा, बिल ऑफ एन्ट्री क्र. ४८५२०४२ दिनांक २०/०५/२०१२ रोजी २४०० बाचक्यांमधील १२०२.२२ क्विंटल साठा व बिल ऑफ एन्ट्री क्र. ७०१६३५५ दिनांक ०५/०६/२०१२ रोजी २४०० बाचक्यांमधील १२००.९८ क्विंटल साठा असा एकूण १२००० बाचक्यांमधील ५९९९.३९ क्विंटल साठा आयात केला असुन मसुर या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ६७३४३०८ दिनांक ०४/०५/२०१२ रोजी बल्क मधील १३५८.२० क्विंटल, बिल ऑफ एन्ट्री क्र. ६९५२०४३

दिनांक २८/०५/२०१२ रोजी बल्क मधील १२९५.३० क्विंटल साठा, बिल ऑफ एन्ट्री क्र. ७२४१६८७ दिनांक २८/०५/२०१२ रोजी बल्क मधील १२३८.२० क्विंटल साठा व बिल ऑफ एन्ट्री क्र. ७३२३२७३ दिनांक ०७/०७/२०१२ रोजी बल्क मधील १३५२.४० क्विंटल साठा असा एकूण बल्क मधील ५२४४.१० क्विंटल साठा आयात केला असल्याचे तसेच त्यापैकी सदरचा काळे उडीद व मसुरचा साठा त्यांनी मे. वर्षा वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याचे दिसून येत आहे. सदरचा दोन्ही कडधान्यांचा आयात केलेला साठयापैकीच नमुद गोदामावर साठवणुक केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. मे. ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि. यांनी सुनावणीमध्ये आयात केलेला साठा सद्य:स्थितीत नमूद गोदामावर शिल्लक असल्याचे सांगुन त्यांनी उपरोक्त आयात साठ्याबाबतचे आय.ई.सी. प्रमाणप्रत्र, बिल ऑफ लेडिंग व बिल ऑफ एन्ट्री ही सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केले आहे. सबब, मे. ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि. यांचा आयात केलेला काळे उडीद व मसुरचा साठा वैध असल्याचे दिसुन येते.

मे. बी.जी.एच. एक्झिम लि. या कंपनीच्या वतीने प्राधिकारपत्रासह कंपनीचे सहाय्यक व्यवस्थापक गुरुदत्त व्यास यांनी कंपनीच्या वतीने केलेल्या खुलाशात, ते कडधान्याच्या साठयाचे आयातदार असुन त्यांचा मे. वर्षा वेअरहाऊस येथे आयात केलेला काळे उडीदचा अंदाजे ३६०.९७४ मे. टन व लेमन तुर अंदाजे २८९.४० मे. टन साठा जप्त असुन दिनांक २०/०५/२०१२ चे शासन परिपत्रकानुसार आयात केलेला कडधान्यांचा साठा निर्बंधमुक्त आहे. साठयाच्या पुराव्यादाखल बिल ऑफ लेडींग, सुचनापत्र व मासिक साठा विवरणपत्राच्या छायांकित प्रती सादर केले असल्याने त्यांचा जप्त असलेला साठा मुक्त करण्याची विनंती केली. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच सांठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने मे. बी.जी.एच. एक्झिम लि. यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला तुर व काळे उडीद या कडधान्यांचा साठा आयात केल्याबाबत या कार्यालयास मासिक विवरणपत्र सादर केल्याचे आढळून आले आहे. मे. बी.जी.एच. एक्झिम लि. यांनी आयात संबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, तुर या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ५१९३३१२ दिनांक १६/११/२०११ रोजी ३३६० बाचक्यांमधील १६८२.४१ क्विंटल व बिल ऑफ एन्ट्री क्र. ५९७१६६९ दिनांक १०/०२/२०१२ रोजी २४०० बाचक्यांमधील १२०१.२० क्विंटल साठा असा एकूण ५७६० बाचक्यांमधील २८८३.६१ क्विंटल साठा आयात केला असुन काळे उडीद या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ५१७९६३९ दिनांक १४/११/२०११ रोजी २४०० बाचक्यांमधील १२०३.८४ क्विंटल, बिल ऑफ एन्ट्री क्र. ५६९६९०७ दिनांक १०/०१/२०१२ रोजी २४०० बाचक्यांमधील १२०३.८४ क्विंटल साठा व बिल ऑफ एन्ट्री क्र. ५१७८६८१ दिनांक १४/११/२०११ रोजी २४०० बाचक्यांमधील १२०३.८४ क्विंटल साठा असा एकुण ७२०० बाचक्यांमधील मधील ३६११.५२ क्विंटल साठा आयात केला असल्याचे तसेच त्यापैकी सदरचा तुर व काळे उडीदचा साठा त्यांनी मे. वर्षा वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याचे दिसून येत आहे. सदरचा दोन्ही कडधान्यांचा

आयात केलेला साठयापैकीच नमुद गोदामावर साठवणुक केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. मे. बी.जी.एच. एक्झिम लि. यांनी सुनावणीमध्ये आयात केलेला साठा सद्य:स्थितीत नमूद गोदामावर शिल्लक असल्याचे सांगुन त्यांनी उपरोक्त आयात साठ्याबाबतचे आय.ई.सी. प्रमाणप्रत्र, बिल ऑफ लेडिंग व बिल ऑफ एन्ट्री ही सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केले आहे. सबब, मे. बी.जी.एच. एक्झिम लि. यांचा आयात केलेला तुर व काळे उडीदचा साठा वैध असल्याचे दिसुन येते.

मे. संघार एक्सपोर्टस्‌चे भागीदार जीतल रमेश शहा यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, ते कडधान्याच्या साठयाचे आयातदार असुन त्यांचा मे. वर्षा वेअरहाऊस येथे आयात केलेला मसुरचा ११६.० मे. टन साठा जप्त असुन सदरचा साठा बिल ऑफ एन्ट्री क्रमांक ७३२९४०९ अन्वये दिनांक ०९/०७/२०१२ रोजी कॅनडा येथुन आयात करुन दिनांक १७/७/२०१२ रोजी सदर वेअरहाऊस येथे साठवणुक केलेला आहे. याबाबत त्यांनी या कार्यालयास दिनांक २३/०७/२०१२ रोजी सुचनापत्र दिलेले आहे. तद्‌नंतर दिनांक १८/०७/२०१२ रोजी २५०५ बाचक्यांमधील १३७.३७ मे. टन साठा हा पुर्विच्या साठया व्यतिरीक्त नमुद गोदामात साठवणुक करुन त्यापैकी दिनांक २०/०७/२०१२ रोजी ३८५ बाचक्यांमधील २०.५१ मे.टन साठा हा खरेदीदारास वितरीत केला असुन उर्वरीत साठा ट्रकची व्यवस्था न झाल्याने त्यांना उचल करणे शक्य झाला नाही. साठयाच्या पुराव्यादाखल बिल ऑफ एन्ट्री व सुचनापत्राच्या छायांकित प्रत सादर करुन जप्त असलेला साठा मुक्त करण्याची विनंती केली. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने मे. संघार एक्सपोर्टस् यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मसुर या कडधान्यांचा साठा आयात केल्याबाबत या कार्यालयास मासिक विवरणपत्र त्यांनी दिनांक २३/०७/२०१२ रोजी म्हणजेच तपासणीनंतर सादर केले. तथापी, तद्‌नंतर दिनांक ०१/०७/२०१२ ते ३१/०७/२०१२ या कालावधीचे मासिक विवरणपत्र त्यांनी प्रचलित पध्दतीनुसार दिनांक ०१/०८/२०१२ रोजी या कार्यालयास सादर केल्याचे आढळून आले आहे. मे. संघार एक्सपोर्टस् यांनी आयात संबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, मसुर या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ७३२९४०९ दिनांक ०९/०७/२०१२ रोजी बल्क मधील १३५८.९० क्विंटल आयात केला असल्याचे तसेच त्यापैकीच सदरचा मसुरचा साठा त्यांनी मे. वर्षा वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याचे दिसून येत आहे. मे. संघार एक्सपोर्टस् यांनी सुनावणीमध्ये आयात केलेला साठा सद्य:स्थितीत नमूद गोदामावर शिल्लक असल्याचे सांगुन त्यांनी उपरोक्त आयात साठ्याबाबतचे आय.ई.सी. प्रमाणप्रत्र, बिल ऑफ लेडिंग व बिल ऑफ एन्ट्री ही सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केली आहेत. सबब, मे. संघार एक्सपोर्टस् यांचा आयात केलेला मसुर या कडधान्याचा साठा वैध असल्याचे दिसुन येते.

0020 मे. संगम ट्रेडिंग कंपनीचे मालक अश्विन पारसमल शहा यांनी सुनावणीवेळी केलेल्या खुलाशात, सिंगापुर येथून आयात करण्यात आलेला वर्षा वेअरहाऊसमध्ये ठेवण्यात आलेला साठा त्यांनी संगम ट्रेडिंग कंपनीच्या नावे खरेदी केला असुन त्यासंबंधीचे इन्वाईस, बिल ऑफ लेडिंग, बिल ऑफ एन्ट्री व सुचित करण्यात आलेले पत्र आणि त्यासंबंधीचे महत्त्वाचे कागदपत्रे निवेदनासोबत जोडली आहेत. त्यांच्याकडे ट्रान्सपोर्टची व्यवस्था नसल्याकारणाने सदरचा मुद्देमाल दिनांक १७/०७/२०१२ रोजी गोडाऊनमध्ये ठेवण्यात आला होता आणि ३ दिवसानंतर त्यांना समजले की, त्यांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तरी सदर मुद्देमाल हा त्यांच्या मालकीचा असल्याने त्यांना परत करण्याची विनंती केली. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने मे. संगम ट्रेडिंग कंपनी यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला काळे उडीद या कडधान्यांचा साठा आयात केल्याबाबत या कार्यालयास प्रचलित पध्दतीनुसार मासिक विवरणपत्र त्यांनी दिनांक १४/०८/२०१२ रोजी म्हणजेच तपासणीनंतर सादर केले. मे. संगम ट्रेडिंग कंपनी यांनी आयात संबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, काळे उडीद या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ७२६५३८८ दिनांक ०२/०७/२०१२ रोजी २४०० बाचक्यांमधील १२०० क्विंटल आयात केला असल्याचे तसेच त्यापैकीच सदरचा काळे उडीदचा साठा त्यांनी मे. वर्षा वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याचे दिसून येत आहे. मे. संगम ट्रेडिंग कंपनी यांनी सुनावणीमध्ये त्यांनी आयात केलेला साठा सद्य:स्थितीत नमूद गोदामावर शिल्लक असल्याचे सांगुन उपरोक्त आयात साठ्याबाबतचे आय.ई.सी. प्रमाणप्रत्र, बिल ऑफ लेडिंग व बिल ऑफ एन्ट्री ही सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केली आहेत. सबब, मे. संगम ट्रेडिंग कंपनी यांचा आयात केलेला काळे उडीद या कडधान्याचा साठा वैध असल्याचे दिसुन येते.

मे. वर्धमान इंडस्ट्रीजचे भागीदार अजय जैन यांनी केलेल्या खुलाशात, त्यांचा मे. वर्षा वेअरहाऊस येथे १००८ बाचक्यांमधील मसुरचा ६५.०५ मे. टन साठा जप्त असुन साठयाच्या पुराव्यादाखल बिल ऑफ एन्ट्री व खरेदी बिलांच्या छायांकित प्रती सादर करुन जप्त असलेला साठा मुक्त करण्याची विनंती केली. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने मे. वर्धमान इंडस्ट्रीज यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मसुर या कडधान्यांचा साठा आयात केल्याबाबत या कार्यालयास प्रचलित पध्दतीनुसार मासिक विवरणपत्र सादर केल्याचे आढळून आले नाही. तथापी, मासिक विवरणपत्र या कार्यालयास सादर करण्याबाबत त्यांना अवगत नसल्याचे सांगून त्यांनी केवळ सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, नवी मुंबई यांचे कार्यालयात अवगत केल्याबाबतचे पत्राची छायांकित प्रत सादर केली असून तसेच त्यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात ते कानपूर स्थित व्यावसायीक असून त्यांचा आयात केलेल्या साठ्यापैकी वितरणाचे तपशिल म्हणून त्यांनी दिनांक २९/०४/२०१२ रोजी ३७० बाचक्यांमधील २०१.१०

क्विंटल व ३७८ बाचक्यांमधील २००.६० क्विंटल, दिनांक ०२/०५/२०१२ रोजी ३९० बाचक्यांमधील १९९.१० क्विंटल, दिनांक ०३/०५/२०१२ रोजी ३७५ बाचक्यांमधील २०१.३० क्विंटल मसुरचा साठा स्वत:च्या वापरासाठी कानपूर येथे पाठविल्याबाबतचे तसेच दिनांक ०२/०५/२०१२ रोजी ३०५ बाचक्यांमधील १६०.५० क्विंटल साठा त्यांनी मे. स्वागत उद्योग, इंदोर यांना विक्री केल्याच्या इन्व्हाईसच्या छायांकित प्रती सादर केल्या असून असे मिळून एकूण ९६२.६० क्विंटल साठ्याच्या वितरणाच्या तपशिल सादर करुन त्यापैकी उर्वरीत साठा हा त्यांनी तात्पुरत्या स्वरुपात मे. वर्षा वेअरहाऊस या गोदामात साठवणूक केल्याचे सांगितले. मे. वर्धमान इंडस्ट्रीज यांनी आयात संबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, मसुर या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ लेडिंग क्र. एचएलसीयुएमटीआर १११०१०७६५ दिनांक २८/१०/२०११ रोजी बल्कमधील १६१३.१० क्विंटल साठा आयात केला असल्याचे तसेच त्यापैकीच १००८ बाचक्यांमधील मसुरचा साठा सद्य:स्थितीत नमूद गोदामावर शिल्लक असल्याचे सांगुन उपरोक्त आयात साठ्याबाबतचे आय.ई.सी. प्रमाणप्रत्र, बिल ऑफ लेडिंग, बिल ऑफ एन्ट्री व इन्व्हाईस ही सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केली आहेत. सबब, मे. वर्धमान इंडस्ट्रीज यांचा आयात केलेला मसुर या कडधान्याचा साठा वैध असल्याचे दिसुन येते.

मे. नेहा पल्सेसचे मालक तुषार संतोष गोयंका यांनी केलेल्या खुलाशात, त्यांचा मे. वर्षावेअरहाऊस येथे साठवणूक केलेला साठा हा सिंगापूर येथून त्यांच्या नेहा पल्सेस या नावे आयात केल्याचे सांगून पुराव्यादाखल बिल ऑफ लॅडिंग, इन्वाईस, पॅकिंग लिस्ट, बिल ऑफ एन्ट्रीच्या छायांकित प्रती सादर केल्या. सदर मुद्देमाल नाव्हाशेवा पोर्ट, मुंबई येथे आल्यानंतर त्यांच्या क्लिअरिंग एजन्टने प्राप्त केला होता. त्यावेळी त्यास समजले की, कंटेनर खराब झाल्यामुळे मुद्देमालाचे नुकसान झाले आहे. त्यासाठी त्यांनी इन्शुरन्स क्लेमकरिता इन्शुरन्स कंपनीला माहिती दिली. सदर माल त्यांनी त्याच्या स्वत:च्या उपयोगाकरिता आयात केल्याचे सांगून इन्शुरन्स क्लेमकरिता सदर मुद्देमाल गोदामात ठेवला असल्याचे सांगितले. सदर मुद्देमाल त्यांनी बँकेमधून लोन घेऊन घेतला असून त्यांना बँकेचे पैसे भरावयाचे आहेत. तरी सदर मुद्देमाल हा त्यांना परत करण्याची विनंती केली. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने मे. नेहा पल्सेस यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला तुर या कडधान्यांचा साठा आयात केल्याबाबत या कार्यालयास प्रचलित प्रध्दतीनुसार मासिक विवरणपत्र त्यांनी दिनांक १४/०८/२०१२ रोजी म्हणजेच तपासणीनंतर सादर केले. मे. नेहा पल्सेस यांनी आयात संबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, तुर या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ४४२५३९० दिनांक २३/०८/२०११ रोजी २४०० बाचक्यांमधील १२००.२२ क्विंटल आयात केला असल्याचे तसेच त्यापैकीच सदरचा तुरचा साठा त्यांनी मे. वर्षा वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याचे दिसून येत आहे. से. नेहा पल्सेस यांनी सुनावणीमध्ये त्यांनी आयात केलेला साठा सद्य:स्थितीत नमूद गोदामावर

शिल्लक असल्याचे सांगुन उपरोक्त आयात साठ्याबाबतचे आय.ई.सी. प्रमाणप्रत्र, बिल ऑफ लेडिंग व बिल ऑफ एन्ट्री ही सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केली आहेत. सबब, मे. नेहा पल्सेस यांचा आयात केलेला तुर या कडधान्याचा साठा वैध असल्याचे दिसुन येते.

मे. संतोष कुमार अँड ब्रदर्सचे मालक संतोष सत्यनारायन अग्रवाल यांनी केलेल्या खुलाशात, त्यांचा मे. वर्षा वेअरहाऊस येथे १४५७ बाचक्यांमधील तुरचा साठा जप्त असुन साठयाच्या पुराव्यादाखल बिल ऑफ एन्ट्री व खरेदी बिलांच्या छायांकित प्रती सादर करुन जप्त असलेला साठा मुक्त करण्याची विनंती केली. मे. संतोष कुमार अँन्ड ब्रदर्स या आस्थापनेने मे. भाविन अँन्ड कंपनी यांचेकडून दिनांक १८/०७/२०१२ रोजी मे. जे. के. इंडस्ट्रिज यांचेकडून दिनांक ०५/०५/२०१२ रोजी बिल क्र. २५१ व २५२ अन्वये व मे. काका फुड प्रोडक्टस् यांचेकडून दिनांक ०७/०५/२०१२ व ११/०५/२०१२ रोजी बिल क्र. १४ व १५ अन्वये तुरचा आयात केलेला साठा खरेदी केल्याचे इन्व्हाईसच्या छायांकित प्रती सादर केल्या असून आयात साठ्याच्या पुराव्यादाखल त्यांनी मे. जे.के. इंडस्ट्रीज यांचे बिल ऑफ एन्ट्री क्र. ६१३५२८७ दिनांक ०१/०३/२०१२ रोजी २४०० बाचक्यांमधील ११९९.८३ क्विंटल तुरच्या साठ्याबाबतचे छायांकित प्रत सादर केली आहे. शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/नापु-२३ दिनांक २० मे, २००८ अन्वये "डाळीसाठी साठा मर्यादा व परवाना घेण्याची आवश्यकता याबाबत लागू केलेले निर्बंध हे आयात केलेल्या साठ्यासाठी लागू राहणार नाहीत. त्यामुळे आयात केलेल्या डाळींच्या साठवणूक व प्रक्रियेसाठी व्यापाऱ्यांना परवाना घेण्याची आवश्यकता नाही. तसेच व्यापारी/कमिशन एंजट/मिलर्स इत्यादींनी या आयात डाळीची विक्री करताना पावतीवर Imported Pulses असा स्पष्ट उल्लेख करावा व आयात केलेल्या डाळीच्या पावतीवरील क्रमांक व दिनांक पावतीवर स्पष्टपणे नमूद करावा." असा उल्लेख आहे. त्याअनुषंगाने वरील नमूद खरेदी बिलांवर आयातदाराने परिपत्रकामध्ये नमूद अटींची पूर्तता केल्याचे दिसून येते. मे. संतोष कुमार अँड ब्रदर्स यांनी सुनावणीमध्ये आयात असलेला त्यांनी खरेदी केलेला साठा संद्य:स्थितीत नमूद गोदामावर शिल्लक असल्याचे सांगुन उपरोक्त साठ्याबाबतचे बिल ऑफ लेडिंग व बिल ऑफ एन्ट्री ही सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केली आहेत. सबब, मे. संतोष कुमार अँड ब्रदर्स यांचा खरेदी केलेला तुर या कडधान्याचा साठा वैध असल्याचे दिसुन येते.

मे. ग्लॅनकोर ग्रेन इंडिया प्रा. लि. या कंपनीच्या वतीने उपस्थित डायरेक्टर श्याम दोषी, सिनियर वाईस प्रेसिडेंट श्रीनिवास बाहेती व ट्रेडर सौरभ भारतीया यांनी केलेल्या खुलाशात, ते कडधान्यासहित इतर शेती मालांचे आयातदार असून दिनांक १७/०९/२०११ रोजी त्यांनी १२२००.०१४ मे. टन पिवळे वटाणाचा साठा आयात केल्याचे सांगून त्या अनुषंगाने त्यांनी उपनियंत्रक शिधावाटप यांना दिनांक १२/०९/२०११ रोजी अवगत केले आहे. सदर कन्साईमेंटमधील आवक झालेला साठा हा विविध गोदामात साठवणूक करुन त्यापैकी विक्री करुन उर्वरीत साठा हा

नवी मुंबई, ठाणे व रायगड येथील विविध गोदामात उपलब्ध असलेल्या जागेनुसार साठवणूक केल्याचे नमूद केले आहे. महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडिटीज होलसेल डिलर्स लायसन्सिंग ऑर्डर, १९९८ तसेच केंद्र शासनाच्या अधिसुचनेनुसार त्यांना साठा निर्बंध लागू नसल्याचे नमूद केले आहे. जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत प्राप्त असलेल्या अधिकारान्वये वर्षा वेअरहाऊसिंग येथील ५८५३७ बाचक्यांमधील कडधान्यांचा आयात केलेला साठा हा जप्त असल्याने जीवनावश्यक वस्तू कायद्यामधील तरतुदी त्यांना लागू होत नसल्याने त्यांचा जप्त करण्यात आलेला साठा मुक्त करण्याची विनंती केली. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने मे. ग्लॅनकोर ग्रेन इंडिया प्रा. लि. यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला पिवळे वटाणा या कडधान्यांचा साठा आयात केल्याबाबत या कार्यालयास प्रचलित पध्दतीनुसार मासिक विवरणपत्र त्यांनी नियमितरित्या सादर केले आहे. मे. ग्लॅनकोर ग्रेन इंडिया प्रा. लि. यांनी आयात संबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, पिवळे वटाणा या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ४६११६३३ दिनांक १७/०९/२०११ रोजी बल्कमधील १२२००.०१४ मे. टन आयात केला असल्याचे तसेच त्यापैकीच सदरचा पिवळे वटाणाचा साठा त्यांनी मे. वर्षा वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याचे दिसून येत आहे. मे. ग्लॅनकोर ग्रेन इंडिया प्रा. लि. यांनी सुनावणीमध्ये त्यांनी आयात केलेला साठा सद्य:स्थितीत नमूद गोदामावर शिल्लक असल्याचे सांगुन उपरोक्त आयात साठ्याबाबतचे आय.ई.सी. प्रमाणपत्र, बिल ऑफ लेडिंग व बिल ऑफ एन्ट्री ही सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केली आहेत. सबब, मे. ग्लॅनकोर ग्रेन इंडिया प्रा. लि. यांचा आयात केलेला पिवळे वटाणा या कडधान्याचा साठा वैध असल्याचे दिसुन येते.

मे. श्री सिध्दी विनायक ऑईल ॲण्ड फुडस् यांनी केलेल्या खुलाशात, ते गुजरात येथे स्थायीक असल्याने त्यांनी कडधान्याच्या आयात व साठवणूक संबंधी अवगत केले नसून ही बाब त्यांच्याकडून नजर चुकीने व कायदे विषयक तरतुदींपासून ते अनभिज्ञ असल्याने राहून गेल्याचे नमूद केले. सदर कृत्याबाबत त्यांनी दिलगिरी व्यक्त केली असून याबाबत त्यांना क्षमापीत करण्यात यावे असे नमूद करुन यापुढे सर्व बाबींची पूर्तता तसेच विवरणपत्र नियमितपणे सादर करण्यात येईल असे नमूद करुन साठा संबंधीचे इम्पोर्ट इन्व्हाईस, बिल ऑफ लेडिंग, बिल ऑफ एन्ट्री इत्यादी कागदपत्रे सादर केली. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने मे. श्री सिध्दी विनायक ऑईल ॲण्ड फुडस् यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला तुर या कडधान्यांचा साठा आयात केल्याबाबत या कार्यालयास प्रचलित पध्दतीनुसार मासिक विवरणपत्र त्यांनी दिनांक १४/०८/२०१२ रोजी म्हणजेच तपासणीनंतर सादर केले. मे. श्री सिध्दी विनायक ऑईल ॲण्ड फुडस् यांनी आयात संबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, तुर या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ५५४२९६५ दिनांक २२/१२/२०११ रोजी ७०००

बाचक्यांमधील ३५०७.०० क्विंटल आयात केला असल्याचे तसेच त्यापैकीच सदरचा तुरचा साठा त्यांनी मे. वर्षा वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याचे दिसून येत आहे. मे. श्री सिध्दी विनायक ऑईल ॲण्ड फुडस् यांनी सुनावणीमध्ये त्यांनी आयात केलेला साठा सद्य:स्थितीत नमूद गोदामावर शिल्लक असल्याचे सांगुन उपरोक्त आयात साठ्याबाबतचे आय.ई.सी. प्रमाणप्रत्र, बिल ऑफ लेडिंग व बिल ऑफ एन्ट्री ही सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केली आहेत. सबब, मे. श्री सिध्दी विनायक ऑईल ॲण्ड फुडस् यांचा आयात केलेला तुर या कडधान्याचा साठा वैध असल्याचे दिसुन येते.

मे. इंडिसन ॲग्रो फुडस् लि. यांनी केलेल्या खुलाशात, सुनावणीमध्ये केलेल्या युक्तीवादाच्या अनुषंगाने ते निवेदन सादर करीत असल्याचे सांगून त्यांचा डॉकमधील साठ्याचा निपटारा होण्यास उशिर झाल्याने त्यांचा साठा नमूद वेअरहाऊसमध्ये साठवणूक करण्यास उशिर झाल्याचे सांगितले. निवेदनासोबत शिपिंग कंपनीकडील पत्रामध्ये डॉकमधील साठा उचलण्याबाबतचे तपशिल नमूद असल्याचे सांगून साठ्यासंबंधीचे बिल ऑफ एन्ट्री, मासिक विवरण पत्र, अवगत केल्याचे पत्र इत्यादी पुरावादर्शक कागदपत्रे सादर करुन त्यांचा जप्त साठा मुक्त करुन त्यांना नमूद वेअरहाऊसमधून उचल करण्याची परवानगी मिळावी असे सांगितले. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने मे. इंडिसन ॲग्रो फुडस् लि. यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला पिवळा वटाणा या कडधान्यांचा साठा आयात केल्याबाबत या कार्यालयास प्रचलित पध्दतीनुसार मासिक विवरणपत्र त्यांनी नियमितरित्या सादर केले आहे. मे. इंडिसन ॲग्रो फुडस् लि. यांनी आयात संबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, पिवळा वटाणा या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ५२९४४०८ दिनांक २५/११/२०११ रोजी बल्कमधील २५२२.५० क्विंटल आयात केला असल्याचे तसेच त्यापैकीच सदरचा पिवळा वटाणाचा साठा त्यांनी मे. वर्षा वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याचे दिसून येत आहे. मे. इंडिसन ॲग्रो फुडस् लि. यांनी सुनावणीमध्ये त्यांनी आयात केलेला साठा सद्य:स्थितीत नमूद गोदामावर शिल्लक असल्याचे सांगुन उपरोक्त आयात साठ्याबाबतचे आय.ई.सी. प्रमाणप्रत्र, बिल ऑफ लेडिंग व बिल ऑफ एन्ट्री ही सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केली आहेत. सबब, मे. इंडिसन ॲग्रो फुडस् लि. यांचा आयात केलेला पिवळा वटाणा या कडधान्याचा साठा वैध असल्याचे दिसुन येते.

शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २००८ अन्वये आयातदारास त्यांनी आयात केलेल्या साठ्याबाबत या कार्यालयास मासिक विवरणपत्र सादर करुन अवगत करणे क्रमप्राप्त आहे. तथापि उपरोक्त नमुद आयातदारांपैकी मे. संघार एक्सपोर्टस्, मे. संगम ट्रेडिंग कंपनी, मे. नेहा पल्सेस व मे. सिध्दी विनायक ऑईल ॲण्ड फुडस् या आयातदारांनी तपासणी नंतर विवरणपत्र सादर केले. तसेच मे. वर्धमान इंडस्ट्रीज व मे. संतोष कुमार ॲण्ड ब्रदर्स यांनी आजमितीस विवरणपत्र सादर न केल्याचे आढळून आले आहे. सदरहू साठा

मालकांनी सुनावणीच्या दरम्यान त्यांना सदरची प्रक्रीया अवगत नसल्याचे सांगून सद्य:स्थितीत शिल्लक यापूढील काळात आयात करण्यात येणाऱ्या साठ्याबाबत नियमीतपणे मासिक विवरणपत्र सादर करणार असे सांगून त्यांनी आयात/खरेदी केलेला साठा हा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक न केल्याचे सांगून सदर साठ्याची नियमीतपणे विक्री करुन सद्य:स्थितीत नमुद गोदामावर त्यापैकीच शिल्लक असलेला साठा हा जप्त करण्यात आलेला असल्याचे सांगीतले आहे. यावरुन आयातदारानी आयात केलेल्या साठ्याबाबतची माहिती या कार्यालयास सादर न केल्याची चुक मान्य केली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेता जप्त साठ्याच्या मालकांनी सादर केलेल्या पुरावादर्शक कागदपत्रावरुन जप्त करण्यात आलेला त्यांचा विविध कडधान्यांचा साठा हा वैध असल्याने शासन परिपत्रकानुसार आयात केलेल्या साठ्याबाबतची माहिती वेळोवेळी न चुकता या कार्यालयास सादर करण्याच्या अटीवर मे. कॉम कॉर्पोरेशन इंटरनॅशनल, मे. ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि., मे. बी.जी.एच. एक्झीम लि., मे. संघार एक्सपोर्टस्, मे. संगम ट्रेडिंग कंपनी, मे. वर्धमान इंडस्ट्रीज, मे. नेहा पल्सेस, मे. संतोष कुमार ॲंड ब्रदर्स, मे. ग्लॅनकोर ग्रेन इंडिया, मे. श्री सिध्दी विनायक फुड्स व मे. इंडिसन अग्रो यांचा जप्त करण्यात आलेला कडधान्यांचा संपूर्ण साठा त्यांना बंधपत्रावर परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी, मे. के.एम. गणात्रा ॲन्ड कंपनीचे भागीदार ललीत काकुभाई गणात्रा यांनी केलेल्या खुलाशात, त्यांचा मिर्ची, खाद्यबिया आणि नटस्, कडधान्य, सिरल्स व पक्षीखाद्याचा निर्यातीचा व्यवसाय असुन फक्त निर्यातीसाठीच असल्याचे सांगून मे. वर्षा वेअरहाऊस येथे साठवणुक केलेला सदरचा साठा त्यांनी जीवनावश्यक वस्तू असलेला २१५.०० क्विंटल सिसम सिडचा साठा उक्त गोदामामध्ये साठवणुक करुन त्या साठ्याचे खरेदी बिल व निर्यात बिल सादर केले आहे. सदरचा साठा कोणताही नफा कमावण्याच्या उद्देशाने अथवा साठेबाजीच्या उद्देशाने ठेवलेला नसुन फक्त निर्यात करण्यासाठीच साठवणुक केलेला असल्याचे नमुद करुन याबाबतचे पुरावादर्शक कागदपत्रे सादर करुन जप्त असलेला साठा मुक्त करण्याची विनंती केली.

मे. जे.के.टी. इन्टरप्राइझेस प्रा.लि. चे संचालक कनक किशोर ठक्कर यांनी केलेल्या खुलाशात, ते शासनमान्य निर्यातदार असुन जप्त केलेला १२४८.७० क्विंटल सिसम सिडचा साठा स्थानिक बाजारपेठेत विक्री करण्यासाठी नसुन सदर साठा हा निर्यात करावयाचा असल्याचे सांगून त्यांचा साठा निर्यातीच्या मागणीनुसार खरेदी केलेला असुन त्याबाबतचे साठा मालकीबाबतचे पुरावे म्हणुन आवश्यक कागदपत्रे सादर केले आहेत. सदरचा खरेदी केलेला त्यांचा साठा गोदामामध्ये साठेबाजीच्या उद्देशाने साठवणुक केलेला नसुन निर्यातीसाठी केलेला आहे. त्यांनी सन २०१० मध्ये परवान्यासाठी अर्ज केलेला होता परंतु त्यांना परवाना मिळाला नसल्याचे सांगुन साठवणुक

केलेला साठा नाशवंत असल्याने त्यांचे निवेदन स्विकारुन त्यांचा सदरच्या गोदामात साठवणुक करण्यात आलेला साठा मुक्त करण्यात यांवा अशी विनंती केली.

तथापी, मे. के.एम. गणात्रा ॲन्ड कंपनी व मे. जे.के.टी. इन्टरप्राइझेस प्रा.लि. या कंपन्यांचा मे. वर्षा वेअरहाऊस या गोदामात त्यांचा जप्त करण्यात आलेला साठा हा सिसम सिड या खाद्यतेलबियांचा असुन, केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२२२७ (अ), दिनांक २७ सप्टेंबर, २०११ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१२ पर्यंत निर्बंध आहेत. तसेच महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ चे कलम २(X) मधील परिशिष्ट मध्ये अनुक्रमांक ४(iii) वर सिसम/तिळ या खाद्यतेलबियाचा समावेश असल्याने सदर साठयाच्या व्यापाराकरीता परवाना घेणे आवश्यक आहे. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१०१०/४९५/प्र.क्र.९४/ ना.पु.२३ दिनांक २० मे, २०१० अन्वये केंद्र शासनाने तांदुळ, धान, डाळी, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठामर्यादेवर निर्बंध लागु केले आहेत. सबब, या वस्तुंचा व्यापार व साठवणुक करण्याकरीता संबंधित अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडून परवाना घेणे आवश्यक आहे. या वस्तुंच्या आयातदारांना साठामर्यादेतुन सुट देण्यात आलेली आहे. परंतु निर्यातदारांना परवाना घेणे आवश्यक आहे, असे स्पष्ट नमुद आहे. उपरोक्त नमूद दोन्ही आस्थापनांनी निवेदनासोबत सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता, त्यांनी महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ अन्वये परवाना मिळण्याकरिता विहित नमुन्यातील अर्जाची छायांकित प्रत सादर केली. मे. के.एम. गणात्रा ॲन्ड कंपनी यांनी सादर केलेल्या अर्जाच्या छायांकित प्रतीवरील दिनांक निरंक असून मे. जे.के.टी. इन्टरप्राइझेस प्रा.लि. यांनी सादर केलेल्या अर्जाच्या छायांकित प्रतीवर दिनांक १३/०१/२०१० असे नमूद आहे. तथापी, शासन परिपत्रक क्र. ईसीए-१०१०/४९५/ प्र.क्र.९४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २०१० अन्वये अर्जदाराने अर्ज करतांना तपासणीसुची प्रमाणे सर्व कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक असुन तसे न केल्यास अर्जदाराने या कागदपत्रांची ३० दिवसात पुर्तता करणे आवश्यक असल्याचे नमुद असुन त्यानंतर देखील अर्जदाराने कागदपत्रांची पूर्तता न केल्यास सदर अर्ज निकाली काढावा अर्थात कागदपत्रांची पुर्तता करणेस दिलेले ३० दिवस ही अंतीम तारीख असेल असे स्पष्ट नमुद केले आहे. मे. के.एम. गणात्रा ॲन्ड कंपनी व मे. जे.के.टी. इन्टरप्राइझेस प्रा.लि. चे मालक/संचालक यांनी सदरचा आवश्यक असलेला परवाना प्राप्त न केल्याचे सुनावणीच्यावेळी कबुल केले आहे. यावरुन त्यांनी परवाना मिळण्याकरीता अर्ज करुन फक्त सोपस्कार पुर्ण केल्याचे दिसुन येत असुन त्यांना सदरचा परवाना प्राप्त करुन घेण्याकरीता स्वारस्य नसल्याचे स्पष्ट होत आहे. मे. के.एम. गणात्रा ॲन्ड कंपनी व मे. जे.के.टी. इन्टरप्राइझेस प्रा.लि. यांचा नमुद गोदामावर जप्त असलेला सिसम सिड या खाद्यतेलबियांचा साठा पुर्णपणे अवैध व विनापरवाना असल्याचे सिध्द होत आहे. मे. के.एम. गणात्रा ॲन्ड कंपनी व मे. जे.के.टी. इन्टरप्राइझेस प्रा.लि. या कंपन्यांनी खाद्यतेलबियांचा

CONTROLLER OF RATIONING ... HE...

साठा हा विनापरवाना खरेदी करुन अवैध साठवणूक केली असल्याने त्यांनी महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ च्या तरतुदींचा भंग केला असल्याचे निष्पन्न झाले आहे. सबब, मे. के.एम. गणात्रा ॲन्ड कंपनी यांचा जप्त करण्यात आलेला २१५.०० क्विंटल व मे. जे.के.टी. इन्टरप्राइझेस प्रा.लि. यांचा जप्त करण्यात आलेला १२४८.७० क्विंटल सिसम सिड या खाद्यतेलबियांचा संपूर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी, मे. वर्षा वेअरहाऊसिंगचे मालक अतुल ब्रिजलाल शहा यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, कारणे दाखवा नोटीस मधील नमुद मुद्दे हे अंशतः खरे असुन उर्वरीत आरोपामध्ये तथ्य नसल्याचे सांगुन उपस्थित अधिकाऱ्यांनी काही कागदपत्रांची मागणी केली असता त्यावेळेस उपलब्ध असलेले कागदपत्रे सादर केली आहेत. त्यांच्याकडे साठवणुकीचा परवाना नसल्याने अधिकाऱ्यांनी त्यांच्याविरुध्द जीवनावश्यक वस्तु कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल केल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी घटनास्थळी नोंदवहीची मागणी केली असता त्यांच्या कर्मचाऱ्यांनी साठामालकांबाबत माहिती सादर केल्याचे सांगुन खरेदी बिलाबाबत विचारणा केली असता सदरचा साठा हा आयात केला असल्याचे सांगुन बिल ऑफ एन्ट्री त्यांचेकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले. नमूद गोदामात जप्त असलेल्या जीवनावश्यक वस्तुंचा साठा मुक्त करण्याची विनंती केली. सदरचा इतर साठा विविध व्यापाऱ्यांचा असुन तो निर्यात करावयाचा असल्याने सद्यस्थितीत वेअरहाऊस सिलबंद असल्याने त्यांना परत न केल्यास त्यांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर नमूद आयातदारांच्या व्यतिरिक्त कोणत्याही व्यापारी यांचा घाऊक/कमिशन एजंट/ किरकोळ या व्यापाऱ्यांचा माल त्यांच्या गोदामामध्ये नाही. सदर नमूद साठामालकांना रेशनिंगचा परवाना लागतो किंवा नाही, याची त्याला माहिती नाही. तथापी, दिनांक २१/०७/२०१२ रोजी पथकाने तपासणी केली. त्यावेळी सदर नमूद आयातदारांचे बिल ऑफ एन्ट्री/बिल ऑफ लॅडिंग इत्यादी कागदपत्रे त्याच्याकडे उपलब्ध नव्हती, ही बाब सत्य असल्याचे सांगितले. यावरुन मे. वर्षा वेअरहाऊसिंगचे मालक अतुल ब्रिजलाल शहा यांनी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे व शासनाची दिशाभुल करणारे आहे. मे. वर्षा वेअरहाऊसिंगचे मालक यांनी सदरचा वेअरहाऊस भाडेतत्त्वावर घेतले असून ते महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या औद्योगिक परिसरात असून नमूद परिसर हा औद्योगिक वापरासाठी असल्याची या कार्यालयाची धारणा असून सदर ठिकाणी मे. वर्षा वेअरहाऊसिंगचे मालक हे नियमबाह्यरित्या वेअरहाऊसिंगचा अनधिकृत व्यवसाय करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. त्यांच्या वेअरहाऊसमध्ये विविध व्यापाऱ्यांचा अनुसुचित वस्तुंचा साठा हा साठवणुक करुन घेतांना सदरहु साठा मालकांना व्यवसायाकरीता परवाना आवश्यक आहे किंवा कसे ? असल्यास त्यांच्या परवान्यावर मे. वर्षा वेअरहाऊसिंग या अतिरिक्त गोदामाची नोंद केली आहे किंवा कसे? याची खातरजमा करणे तसेच त्यासंबंधीचे पुरावादर्शक कागदपत्रे घेणे आवश्यक होते. तथापी, मे. वर्षा वेअरहाऊसिंगचे

मालक यांनी याबाबत संबंधित साठा मालकांकडून सदर बाबत पूर्तता करुन न घेता अथवा संबंधित साठामालकास त्यांच्या गोदामात अवैध साठवणुक व साठेबाजीच्या उद्देशाने साठवणुक केलेल्या साठामालकास गैरमार्गाने मदत करुन त्यांनी स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी जीवनावश्यक वस्तुंच्या भाववाढीस प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न होत आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०७१/२०१२ दिनांक २२/०७/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

आदेश :-

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. कॉम कॉर्पोरेशन इंटरनॅशनल यांचा ४८०० बाचक्यांमधील २४०.०० मे. टन काळा उडिदचा व ७२५० बाचक्यांमधील ३६२.५० मे. टन तुरचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

२) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. ताज अॅग्रो कमोडीटीज प्रा.लि. यांचा ९१२८ बाचक्यांमधील ४५६.४० मे. टन काळा उडिदचा व ३४४३ बाचक्यांमधील १७२.१५ मे. टन मसुरचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

३) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. बी.जी.एच. एक्झीम लि. यांचा ७२०० बाचक्यांमधील ३६०.०० मे. टन काळा उडिदचा व ५७६० बाचक्यांमधील २८८.०० मे. टन तुरचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

४) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. संघार एक्सपोर्टस् यांचा २१२० बाचक्यांमधील १०६.०० मे. टन मसुरचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

५) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. संगम ट्रेडिंग कंपनी यांचा २४०० बाचक्यांमधील १२०.०० मे. टन काळा उडिदचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

६) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. वर्धमान इंडस्ट्रीज यांचा १००८ बाचक्यांमधील ५०.४० मे. टन मसुरचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

७) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. नेहा पल्सेस यांचा १९५७ बाचक्यांमधील ९७.८५ मे. टन तुरचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

0029

८) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. संतोष कुमार अँड ब्रदर्स यांचा १४५६ बाचक्यांमधील ७२.८० मे. टन तुरचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

९) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. ग्लॅनकोर ग्रेन इंडिया यांचा ५८५३७ बाचक्यांमधील २९२६.८५ मे. टन पिवळा वाटाण्याचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

१०) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. श्री सिध्दी विनायक फुड्स यांचा १४८५ बाचक्यांमधील ७४.२५ मे. टन तुरचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

११) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. इंडिसन अग्रो यांचा ७४० बाचक्यांमधील ३७.०० मे. टन पिवळा वाटाण्याचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

१२) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. के.एम. गणात्रा ॲन्ड कंपनी यांचा २१५.०० क्विंटल सिसम सिड या खाद्यतेलबियाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

१३) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. जे.के.टी. इन्टरप्राइझेस प्रा.लि. यांचा १२४८.७० क्विंटल सिसम सिड या खाद्यतेलबियाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

१४) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण सिसम सिड या खाद्यतेलबियाचा साठा पोलिसांनी, उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्या मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... OFFICE ... MUMBAI

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. वर्षा वेअरहाऊसिंगचे मालक अतुल ब्रिजलाल शहा
२) मे. ग्लॅनकोर ग्रेन इंडिया
३) मे. कॉम कॉर्पोरेशन इंटरनॅशनल
४) मे. ताज ॲग्रो कमोडीटीज

५) मे. बी.जी.एच. एक्झिीम
६) मे. संघार एक्सपोर्टस्
७) मे. संगम ट्रेडिंग कंपनी
८) मे. वर्धमान इंडस्ट्रीज
९) मे. नेहा पलसेस्
१०) मे. श्री सिध्दी विनायक फुड्स
११) मे. इंडिसन ॲग्रो फुडस्
१२) मे. संतोष कुमार अँड ब्रदर्स
१३) मे. जे.के.टी. एन्टरप्राइझेस प्रा.लि.
१४) मे. के.एम.गणात्रा ॲन्ड कंपनी

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.
५) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.